रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २६२
www.ramprahar.com

गुरुवार, १० एप्रिल २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

मराठी चित्रपट महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण/२

नेरळ परिसरात चार कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन/५

आरकेएल : आवास वायपर्सचा प्लेऑफमध्ये प्रवेश निश्चित/८

## यंदा देशात दमदार पाऊस पडण्याचा अंदाज



**मुंबई :** या वर्षी देशात पडणाऱ्या मान्सूनसंदर्भात स्कायमेट संस्थेकडून पहिला पूर्वअंदाज जारी करण्यात आला आहे. 'स्कायमेट'ने वर्तवलेल्या अंदाजानुसार जूनमध्ये मान्सूनचे आगमन होईल व तो संथ गतीने पुढे सरकरणार आहे. त्यानंतर जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये चांगला पाऊस पडण्याचा अंदाज आहे. यंदा देशभरात पावसाचे प्रमाण सामान्य राहणार असून १०३ टक्क्यांपर्यंत पाऊस पडू शकतो असे स्कायमेटने म्हटले आहे. याबाबत माहिती देताना स्कायमेटच्या तज्ज्ञांनी सांगितले की, १ जून ते ३० सप्टेंबर या काळात देशभरात ८९५ मिमी इतका पाऊस होण्याचा अंदाज आहे. यंदा देशात मान्सून सामान्य राहण्याचा अंदाज ४० टक्के इतका आहे, तर सामान्यपेक्षा अधिक पाऊस पडण्याची शक्यता ३० टक्के असून अतिवृष्टीची शक्यता १० टक्के इतकी आहे.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली

# खालापूर येथे हिंदू गर्जना मोर्चा

### गोमातेचे रक्षण, आरोपींवर कठोर कारवाईची मागणी





**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

गोमातेचे रक्षण व्हावे, अवैध कत्तलखाने बंद करावेत, आरोपींविरुद्ध कठोर कारवाई केली जावी तसेच गोरक्षक व पोलिसांच्या सुरक्षेची मागणी करीत सकल हिंदू समाजाच्या वतीने आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली बुधवारी (दि. ९) खालापूर तहसील कार्यालयावर हिंदू गर्जना मोर्चा काढण्यात आला होता. समाजकंटकांवर पोलीस आणि प्रशासनाची जरब असेल, तरच गैरकृत्ये बंद होतील, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी अधोरखित केले.

महिन्यापूर्वी खोपोलीजवळील हाळ गावात गोवंश हत्येनंतर उद्रेक झाला होता. खालापूर पोलिसांनी तातडीची कारवाई करीत १८ आरोपींना ताब्यात घेतले. शिवाय तालुक्यातील मुस्लिम बांधवांनीदेखील या घटनेचा निषेध करीत गोरक्षणासाठी पुढाकार घेणार असल्याचे पत्र रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांना दिले होते. त्यामुळे तणाव निवळला, परंतु भविष्यात अशा घटना घडू नये तसेच अटक आरोपींना कठोर शासन व्हावे यासाठी बुधवारी खालापूर फाटा ते तहसील कार्यालय अशा हिंदू गर्जना मोर्चाचे आयोजन सकल हिंदू समाज खालापूरतर्फे करण्यात आले होते. मोर्चाचे नेतृत्व आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. या मोर्चा मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी गोवंश पूजन केल्यानंतर मोर्चाला सुरुवात झाली. खालापूर तहसील आवारात मोर्चा अडविण्यात आला. या वेळी मागील निवेदनावर काय कारवाई झाली याची माहिती तहसीलदार अभय चव्हाण व वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या उपस्थितीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी घेतली.

खालापुरातील अनेक बेकायदा कृत्यांवर कारवाई झाली असून उर्वरित राहिलेल्या काही मुद्द्यांवर आठ दिवसात कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन तहसीलदार अभय चव्हाण व वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी दिले. त्यावर येत्या पंधरा दिवसांत आपण उपविभागीय पोलीस अधिकारी यांचीही भेट घेणार असून खोपोली येथील गुन्हेगारीवर नियंत्रण न आल्यास तेथील पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात येईल, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले.

मोर्चेकऱ्यांनी तहसीलदार चव्हाण यांना निवेदन दिले असून अवैध कत्तलखान्यावर कारवाई तसेच गोवंश हत्या प्रकरणात हिंदू समाजाच्या भावना पत्राद्वारे शासनापर्यंत पोहचवण्याचे आवाहन केले आहे.

या मोर्चावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहरे, तालुका मंडळ अध्यक्ष यादव, खोपोली शिवसेना नेते राहुल गायकवाड, सकल हिंदू समाज संघटक राकेश मिरवणकर, तालुका निमंत्रक संकेत पाटील, भाजप महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, भाजप तालुका उपाध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्यासह सकल हिंदू समाज कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चामध्ये महिलांची संख्यादेखील लक्षणीय होती. यानंतर आमदार प्रशांत ठाकूर यांनी खालापूर पोलीस ठाण्यात जाऊन कायदा व सुव्यवस्थेची माहिती घेतली.

## पंडित पाटील अनुभवी नेते

### भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे प्रतिपादन




**पाली : प्रतिनिधी**

अलिबागचे माजी आमदार पंडित पाटील हे अनुभवी व तळागाळातील शेतकरी, कष्टकरी जनतेसाठी झटणारे नेते आहेत. त्यांच्यासह माजी जि.प. उपाध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, चित्रा पाटील व त्यांचे समर्थक येत्या १६ एप्रिलला भाजपमध्ये प्रवेश करणार असून यामुळे येथे पक्षाला बळ मिळेल, असे प्रतिपादन भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.

रायगड प्रीमियर कबड्डी लीगला शुभेच्छा देण्यासाठी भाजप प्रदेश कार्याध्यक्ष चव्हाण मंगळवारी (दि. ८) अलिबाग येथे आले होते. ते म्हणाले, पंडित पाटील, आस्वाद पाटील, चित्रा पाटील हे ग्राउंडवर काम करणारे नेते आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात केंद्र व राज्य सरकारने शेतकरी, कष्टकरी, कामगारवर्गासाठी अनेक हितकारक योजना आणल्या आहेत. या योजना पंडित पाटील, आस्वाद पाटील यांच्या माध्यमातून येथील लाभार्थी वर्गापर्यंत पोहचतील.

या वेळी भाजप नेते रवींद्र चव्हाण यांनी गृहमंत्री अमित शाह यांच्या रायगड दौऱ्यावरही भाष्य केले. रायगड किल्ल्यावर वर्षानुवर्षे शिवरायांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या माध्यमातून होत असतो. या कार्यक्रमास शिवप्रेमी मोठ्या संख्येने येत असतात. यंदा या कार्यक्रमाला देशाचे गृहमंत्री अमित शाह उपस्थित राहणार आहेत. ते महाराष्ट्राला, शिवप्रेमींना दिशा देणारे मार्गदर्शन करतील, असे चव्हाण म्हणाले. सोबत भाजप जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते होते.

## शिवपुण्यतिथीनिमित्त रायगडावर विविध कार्यक्रम



**रायगड : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने १२ एप्रिल रोजी रायगड किल्ल्यावर सकाळी ११ वाजता विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आह. यामध्ये राजदरबारात श्री शिवप्रतिमा पूजन, सैन्यदल अधिकारी आणि सरदार घराणे सन्मान, गडरोहण स्पर्धा बक्षीस वितरण सोहळा, श्री शिवपुण्यस्मृती रायगड पुरस्कार वितरण, शिवरायमुद्रा स्मरणिका प्रकाशन असे कार्यक्रम होतील.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह उपस्थित राहणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार हेही असतील. त्याचप्रमाणे मंत्री, खासदार व आमदार अभिवादन करणार आहेत.

कार्यक्रमात श्री शिवपुष्पस्मृती रायगड पुरस्कार दुर्ग अभ्यासक निलकंठ रामदास पाटील यांना प्रदान करण्यात येणार आहे तसेच सैन्यदल अधिकारी ले.जनरल संजय कुलकर्णी यांचा सन्मान व सरदार घराणे सन्मान, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज उदयसिंगजी होळकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे. दौऱ्यात किल्ले रायगड व सुतारवाडी येथे केंद्रीय गृहमंत्री भेट देणार आहेत.

दरम्यान, या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सुरक्षा कारणास्तव सकाळी ७ ते दुपारी ४ या वेळेत दोन किमी परिसरात ड्रोन, पॅराग्लायडर, पॅरामोटर्स, हॅङ्ग्लायडर्स इत्यादींच्या वापरावर बंदी घातली आहे. या आदेशाचे उल्लंघन केल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

## निवडक

### ब्रह्मकुमारीजच्या मुख्य प्रशासक दादी रतनमोहिनी यांचे निधन



**अहमदाबाद :** आध्यात्मिक जगातील एक मोठे व्यक्तिमत्व आणि प्रजापिता ब्रह्मकुमारीज ईश्वरी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासक राजयोगिनी डॉ. दादी रतनमोहिनी यांचे वयाच्या १०१व्या वर्षी निधन झाले. दोन दिवसांपूर्वी आजारी पडल्यामुळे त्यांना अहमदाबादमधील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्यावर शांतीवनमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या निधनाबद्दल देशातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

### ट्रम्प यांच्या घोषणेनंतर चीनचाही अमेरिकेवर वाढीव आयात कर

**न्यूयॉर्क, बीजिंग :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चिनी मालावर १०४ टक्के आयात शुल्क लादण्याची घोषणा केली. यानंतर चीननेही मोठी घोषणा करत अमेरिकन वस्तूंवर ८४ टक्के वाढीव आयात कर लादण्याचा निर्णय घेतला आहे. अमेरिका आणि चीनमधील हे 'टॅरिफ वॉर' आणखी तीव्र होत असून याचा परिणाम जागतिक व्यापारावर होण्याची शक्यता आहे.

## थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा

### सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायतीला मिळणार एक लाख रुपयांचे बक्षीस



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३७व्या पुण्यतिथी निमित्ताने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत पनवेल तालुकास्तरीय स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२५चे आयोजन करण्यात आले आहे.

स्व. जनार्दन भगतसाहेबांचे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कार्य अफाट राहिले आहे. त्यांनी अहोरात्र जनतेची सेवा केली. फक्त राजकारण नाही तर सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. आयुष्यापेक्षा ध्येय मोठे असले पाहिजे, ही शिकवण त्यांनी समाजामध्ये रूजवली. या भागाचे ते देवदूत होते. त्या अनुषंगाने स्व. भगतसाहेबांच्या नावाने स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार या वर्षीही दिला जाणार आहे. त्यानुसार तालुक्यातील ग्रामपंचायतींचे स्वच्छतेच्या निकषावर सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

या स्पर्धेतील प्रथम क्रमांक विजेत्या ग्रामपंचायतीला एक लाख रुपये व सन्मानचिन्हे, द्वितीय ५० हजार रुपये व सन्मानचिन्हे, तृतीय २५ हजार रुपये व सन्मानचिन्हे तसेच दोन उत्तेजनार्थ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ११ हजार रुपये व सन्मानचिन्हे देऊन ७ मे रोजी उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदान येथे होणाऱ्या पुण्यतिथी कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेचा तालुक्यातील ग्रामपंचायतींनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर यांनी केले आहे.

## खोपोलीतील कर्जबाजारी युवकाची रेल्वेखाली आत्महत्या



**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील ३२ वर्षीय तरुणाने स्वतःला रेल्वेखाली झोकून देत आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. सुनील नडवीरमणी असे या तरुणाचे नाव असून ऑनलाईन रमीच्या नादात कर्जबाजारी झाल्याने सुनीलने जीवन संपविल्याचे सांगण्यात येत आहे .

खोपोली साईबाबा नगर येथील ३२ वर्षीय सुनील नडवीरमणी याने ७ एप्रिल रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास खोपोली ट्रेनखाली उडी मारून आत्महत्या केली. सुनील ऑनलाईन रमीच्या आहारी गेला होता. या नादात तो कर्जबाजारी झाला होता. ७ एप्रिलला रात्री तो औषध आणायला जातो सांगून घरातून बाहेर पडला, मात्र घरी परत आलाच नाही. शोधाशोध केली असता सुनीलचा मृतदेह खोपोली रेल्वेस्थानकामध्ये आढळून आला.

## चिमुकल्या नातवासह गच्चीवरून उडी मारून आजीने जीवन संपवले

### रोह्यातील खळबळजनक घटना



**धाटाव, रोहा : प्रतिनिधी**

रोह्यातील महिलेने एक वर्षाच्या नातवासह बिल्डिंगच्या टेरेसवरून उडी मारल्याने दोघांचाही मृत्यू झाला आहे. रोहा-कोलाड रोडलगत असलेल्या ओम चेंबर इमारतीमध्ये बुधवारी (दि. ९) ही हृदयद्रावक घटना घडली.

उर्मिला सिद्धीराज कोरे (वय ५१) असे आत्महत्या करणाऱ्या महिलेचे नाव असून त्यांनी बुधवारी सकाळी साडेसातच्या सुमारास नातू वेदांत विवेक भोगडे (वय १) याच्यासह बिल्डिंगच्या टेरेसवरून उडी मारल्याने आजीचा जागीच मृत्यू झाला, तर नातू वेदांतला गंभीर दुखापत झाल्याने सुरुवातीला रोहा शासकीय हलवण्यात आले होते, पण नाजूक परिस्थिती असल्यामुळे अधिक उपचाराकरिता पनवेलजवळील एमजीएम रुग्णालयात नेत असताना त्याची प्राणज्योत मालवली. या घटनेमुळे संपूर्ण परिसर हादरला असून सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, मयत उर्मिला कोरे यांना मानसिक आजार होता. त्या वेळेवर गोळ्या औषध उपचार घेत नसल्यामुळे त्रास बळावला होता, अशी माहिती समोर आली आहे. पोलीस याबाबत अधिक तपास करीत आहेत.

## लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयाला आयएसओ मानांकन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजला आयएसओ मानांकन प्राप्त झाले आहे. विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांनी हे प्रमाणपत्र स्वीकारले. दरम्यान, या यशाबद्दल संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.

विविध उपक्रमांमध्ये नेहमीच अग्रेसर असणाऱ्या विद्यालयाच्या शिरपेचात आयएसओ मानांकनाने मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांची प्रगती व सर्वांगीण विकास हाच ध्यास असणाऱ्या या विद्यालयातील शैक्षणिक व इतर उपक्रम, भौतिक सुविधा, स्वच्छ व पोषक वातावरण या साऱ्याची दखल घेऊन हे मानांकन प्राप्त झाले आहे.

वर्ष २०२५चे आयएसओ ९००१:२०१५ क्वॉलिटी मॅनेजमेंट सिस्टिमचे हे मानांकन प्रमाणपत्र किंगबर्ड कन्सल्टन्सीचे डायरेक्टर विजय नाळे तसेच ऑडिटर प्रमोद मांडवे यांच्या सहकार्याने मिळाले. गुणवत्तेच्या निकषातून प्राप्त झालेल्या आयएसओ मानांकनाने विद्यालयात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

या बहुमानाबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाचे चेअरमन व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांनी विद्यालयाच्या प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे, सहकारी शिक्षक, कर्मचारीवृंद यांचे विशेष अभिनंदन केले. या वेळी संस्थेचे रायगड विभाग पीआरओ बाळासाहेब कारंडे, लोकनेते रामशेठ पब्लिक स्कूलचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, पर्यवेक्षिका सारिका लांजूरकर, प्रियांका बांगर आदी उपस्थित होते.

## क्लबचे छत कोसळून सुमारे १०० जणांचा मृत्यू

**सँटो डोमिंगो : वृत्तसंस्था**

डोमिनिकन रिपब्लिकमधील एका नाईट क्लबचे छत कोसळून मोठा दुर्घटना घडली आहे. देशाची राजधानी सँटो डोमिंगो येथील प्रसिद्ध जेट सेट डिस्कोथेकमध्ये झालेल्या या दुर्घटनेत सुमारे १०० जणांचा मृत्यू झाला असून १५०हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

प्रसिद्ध गायिका रुबी पेरेझच्या संगीत कार्यक्रमादरम्यान नाईट क्लबचे छत अचानक कोसळले. मृतांमध्ये प्रसिद्ध गायक, मोंटे क्रिस्टी प्रांताचे गव्हर्नर आणि माजी मेजर लीग बेसबॉल पिचर ऑक्टाव्हियो डोटेल यांचा समावेश आहे. बचाव पथके ढिगाऱ्याखाली दबलेल्या नागरिकांचा शोध घेत आहेत.

## ठंडा ठंडा कुल कुल!



(छाया : सुधीर नाझरे)

**मुरूड :** तापमानाचा पारा दिवसेंदिवस वर सरकत असून कडक उन्हामुळे अंगाची लाही लाही होत आहे. उकाड्याने हैराण झालेली कोळी बांधवांची मुले एकदरा खाडीत पोहून आनंद लुटत आहेत.

# स्व. सुधीर फडके दृक-श्राव्य संकुल सांस्कृतिक क्षेत्रासाठी नवसंजीवनी

## कलाकारांना मिळणार एकाच छताखाली सर्व सुविधा –मंत्री ॲड. आशिष शेलार

**मुंबई, : प्रतिनिधी**

प्रसिद्ध गायक–संगीतकार सुधीर फडके उर्फ बाबूजी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उभारण्यात आलेल्या 'स्वर गंधर्व सुधीर फडके दृक–श्राव्य' या संकुलात ३६० डिग्री क्रोमा स्टुडिओ, रेकॉर्डिंग, एडिटिंग, मिक्सिंग, चित्रीकरण, ऑडिओ–व्हिज्युअल अशा सर्व सुविधा उपलब्ध आहेत. सर्व कलाकारांसाठी या सर्व सुविधा माफक दरात एकाच छताखाली उपलब्ध होणार असल्याचे प्रतिपादन सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले.



पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथे स्वर गंधर्व सुधीर फडके दृक–श्राव्य संकुलाचा लोकार्पण सोहळा सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार यांच्या प्रमुख उपस्थितीत व ज्येष्ठ संगीतकार, गायक श्रीधर फडके यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. त्यावेळी मंत्री ड. शेलार बोलत होते. यावेळी सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, पु. ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, गायिका उतरा केळकर, कला व संगीत क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले, स्वर गंधर्व सुधीर फडके यांच्या नावाने अद्याप काहीच नव्हतं, आणि म्हणूनच हे नाव देणे हे सर्वार्थाने योग्य होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर 'सुधीर फडके' हे नाव निश्चित करण्यात आले. या संकुलाच्या निमित्ताने स्व. सुधीर फडके यांच्या स्मृतींना उजाळा मिळणार आहे.

स्वर गंधर्व सुधीर फडके दृक–श्राव्य संकुलाचे नाव सुचविण्यापासून ते उभारणी पर्यंत विशेष मेहनत घेणार सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे व अकादमीच्या संचालिका मीनल जोगळेकर यांचे विशेष कौतुक करून अभिनंदन केले.

### संकुलाची रचना

स्वर गंधर्व सुधीर फडके दृक–श्राव्य संकुलामध्ये ध्वनिमुद्रण कक्ष, आभासी चित्रीकरण (क्रोमा) कक्ष, पाच अद्ययावत संकलन कक्ष, रंगपट, पूर्व परीक्षण (प्रिव्ह्यू) दालन, व्हीएफएक्स व प्रशिक्षण वर्ग अशी रचना आहे.

मराठी मनावर अधिराज्य गाजविणारे महान संगीतकार तसेच भावगीत भक्तीगीतेतील अलौकिक स्वर गंधर्व स्वर्गीय सुधीर फडके यांच्या अजरामर गीतांचा कार्यक्रमातून त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यात आला. ज्येष्ठ संगीतकार, गायक श्रीधर फडके यांनी 'देव देव्हाऱ्यात नाही...: या गाण्याने सर्व रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करून स्व. सुधीर फडके यांच्या चिरंतन स्मृतींना वंदन केले. तसेच यावेळी गायक अजित परब, सोनाली कुलकर्णी, केतकी भावे–जोशी, अभिषेक नलावडे यांचा सहभाग होता. कार्यक्रमात उत्कृष्ट बासरी वादनाचाही समावेश होता. खास सुधीर फडके यांना श्रद्धांजली म्हणून हा अनोखा सांगीतिक क्षण उपस्थितांना भावनिक करून गेला.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले तर अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर यांनी आभार मानले. सूत्र संचालन कुणाल रेगे व संगीत संयोजन प्रशांत लळीत यांनी केले.

# माणगावमध्ये जिवंत सातबारा मोहीम

**माणगाव : बातमीदार**

महाराष्ट्र शासन वन व महसूल विभागातर्फे १०० दिवस कृती कार्यक्रम आराखडा अंतर्गत जिवंत सातबारा मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून या उपक्रमात जवळजवळ ६५० ते ७०० मयत सातबारा शोधण्याचे काम महसूल विभागातर्फे करण्यात आले असून माणगाव तालुक्यातील साई ग्रामपंचायतमध्ये जिवंत सातबारा मोहीम राबविण्यात आली.

यावेळी साई ग्रामपंचायतीच्या सरपंच हवाबी राहटवीलकर, उपसरपंच खेरटकर, साई सजा तलाठी सुमित्रा पोटे, प्रियांका धुमाळ,माजी सरपंच हुसेन राहटविलकर, उपस्थित होते.

जिवंत सातबारा मोहीम अंतर्गत सातबारा वरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण असल्याने मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमिनीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांमध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखांमध्ये नोंद न झाल्यास अडचणींना सामोरे जावे लागेल या दृष्टिकोनातून जिवंत सातबारा मोहीम राबवण्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे

माणगाव तालुक्यातील ठिकठिकाणी जिवंत सातबारा मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी साई पंचक्रोशीतील प्रशांत अधिकारी, गणेश पवार व इतर शेतकरी खातेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पहिल्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मराठी चित्रपट महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठी सिनेमाची चित्रपताका घेऊन अटकेपार जाणारा मावळा या अर्थाने राज्याच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय मराठी चित्रपट महोत्सवाचे नाव 'चित्रपताका' असे ठेवण्यात आले आहे. त्याचेच प्रतिकात्मक रूप बोधचिन्हात उमटले असून घोड्यावर बसलेला, हातात पताका आणि रिळ स्वरूपातील ढाल घेऊन पुढे चाललेला मराठी चित्रपटकर्मी मावळा या बोधचिन्हात आहे' अशी माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी मंगळवारी प्रभादेवी येथील पु. ल. देशपांडे कला अकादमीत झालेल्या पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मराठी चित्रपट महोत्सवाच्या बोधचिन्हाचे अनावरण सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले.



या पत्रकार परिषदेत महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी गीता देशपांडे, वित्तीय सल्लागार– मुख्य लेखा वित्त अधिकारी चित्रलेखा खातू रावराणे, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर, तसेच महोत्सवाचे संचालक ज्येष्ठ निर्माते, दिग्दर्शक पुरुषोत्तम बेर्डे उपस्थित होते.

२१ ते २४ एप्रिल दरम्यान पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी येथे ' चित्रपताका ' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.या चार दिवसांच्या चित्रपट महोत्सवात एकूण ४१ दर्जेदार मराठी चित्रपट दाखवले जाणार आहेत. या चित्रपटांमध्ये पूर्ण लांबीचे सामाजिक, ग्रामीण, ऐतिहासिक, पर्यावरण विषयक, स्त्री जीवना विषयक प्रश्न मांडणारे चित्रपट, बालचित्रपट, विनोदी अशा विविध जॉनरच्या चित्रपटांचा समावेश आहे.

चित्रपटांची निवड करण्यासाठी डॉ.संतोष पाठारे, सुकन्या कुलकर्णी, समीर आठल्ये आणि पुरुषोत्तम बेर्डे या तज्ज्ञांची निवड समिती नेमण्यात आली होती. या महोत्सवात चित्रपट क्षेत्रातील विविध विषयांवर पाच परिसंवाद, दोन मुलाखती आणि दोन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. सिने पत्रकारांसाठी विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

'चित्रपताका'च्या माध्यमातून मराठी सिनेमा साता समुद्रपार पोहोचावा, आणि ही घौडदौड यापुढेही अशीच सुरू राहावी, हीच या महोत्सवामागील प्रेरणा आहे.

हा महोत्सव विनामूल्य असून ऑनलाईन वा प्रत्यक्ष कला अकादमी येथे येऊन महोत्सवासाठी नावनोंद करणे गरजेचे आहे. सर्व मराठी चित्रपट रसिकांना या महोत्सवाला हजेरी लावण्याचे आवाहन ह्या वेळी माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केले.

# ना. शाहांच्या किल्ले रायगड दौऱ्याच्या तयारीचा प्रशासकीय आढावा

**महाड : प्रतिनिधी**

शिवपुण्यतिथीनिमित्ताने केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या १२ एप्रिल रोजी होणाऱ्या किल्ले रायगड दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बुधवार ९ एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृह महाड येथे राज्याचे रोजगार हमी खात्याचे कॅबिनेटमंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत सर्व प्रमुख विभागांची आढावा बैठक घेण्यात आली.



या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, महाडचे प्रभारी प्रांताधिकारी राजकुमार सानप, तहसीलदार महेश शितोळे गटविकास अधिकारी डॉ. स्मिता पाटील, इत्यादी प्रमुख अधिकाऱ्यांसह केंद्रीय पुरातत्व विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, वन विभाग, महावितरण, पंचायत समिती, पोलीस दल, महसूल विभाग, राज्य परिवहन, पशुवैद्यकीय विभाग, आरटीओ,रायगड रोपवे प्रशासन,आरोग्य विभाग, नगरपरिषद प्रशासन,पाणीपुरवठा विभाग यांसह अन्य शासकीय,प्रशासकीय विभागांचे प्रमुख प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.

सदर अभिवादन कार्यक्रम आपल्या मतदारसंघात व जिल्ह्यात होत असल्याने तो सुनियोजित व सुव्यवस्थितपणे पार पडण्याची मोठी जबाबदारी आपल्या सर्वांवर असल्याचे मंत्री गोगावले यांनी उपस्थित अधिकारीवर्गाला सांगितले आणि प्रत्येक विभागाकडून रायगडच्या पायथ्यापासून ते प्रत्यक्ष गडावर होणाऱ्या संपूर्ण कार्यक्रमाच्या नियोजनाचा आढावा घेतला.

यामध्ये वाहनतळ, एसटी गाड्यांचे जाण्या–येण्याचे नियोजन, प्रमुख व आवश्यक ठिकाणी वीजपुरवठा, पिण्याचे पाण्याचे नियोजन, रोपवेच्या वापराच्या वेळा, गडाचा पायथा ते गडावरील कार्यक्रमा दरम्यानची आरोग्य सुविधा, तात्पुरती होणारी हेलिपॅड निर्मिती, रस्ते व दळणवळणाचे नियोजन या प्रमुख मुद्द्यांवर चर्चा करून यातील त्रुटी व समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश मंत्री गोगावले यांनी सर्व अधिकाऱ्यांना बैठकीदरम्यान दिले.

# 'कलावंतीण' सर करत शिवरायांना अभिवादन

**नवी मुंबई : बातमीदार**

प्रबळगड हा सरळ उंच थेट अवकाशाला भिडणारा सुळका. या सुळक्याला कलावंतीण असे संबोधले जाते. २८ मार्च २०२१ कोविडच्या संकटातून जग सावरत असताना, पनवेलमधील शिवभक्तांनी प्रबळगड मोहीम आखत, कलावंतीण सुळक्यावर महाराजांच्या अश्वारूढ मूर्तीची स्थापनाकरुन शिवस्मारक उभारले आहे. यंदा या महाराजांच्या मूर्ती स्थापनेचा चौथा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने शिवभक्तांनी गडद अंधारात प्रबळगड सर करत पहाटे सूर्योदयाला महाराजांची आरती करत वर्धापन दिन साजरा केला.



महाराजांच्या सिंहासनारूढ शिवस्मारकाचा वर्धापन दिन साजरा करण्यासाठी रात्रीची मोहीम आखण्यात आली. यासाठी मध्यरात्री एक वाजता पनवेलवरून शिवभक्त प्रबळगडाजवळ पोहोचले. रात्रीच्या गडद अंधारात गड चढून पूर्ण केला. थकलेले असूनही न झोपता, आणलेली चटणी भाकरी भाजी खाऊन पुन्हा कलावंतीण सुळका सर करत शिवस्मार गाठले. पहाटे सुळका सर करून सूर्याच्या पहिल्या किरणाला महाराजांना अभिषेक घालण्यात आला. गुलाल उडवत महाराजांचा जयघोष केला.

तर महाआरती तसेच संकटमोचन हनुमानाची आणि विघ्नहर्त्या गणेशाची आरती करण्यात आली. यावेळी दत्ता पोखरकर,अविनाश पाटील,संतोष जाधव,ठोंबरे काका,दिपक भोसले,संदेश काळभोर,सुनील औटी,प्रसाद खोपडे,संतोष मूटल,राजू डेरे,प्रविण मोरे,निवृत्ती निबुदे,शिवाजी ठाकरे,महेश परब व इतर शिवभक्त उपस्थित होते. चार वर्षांपूर्वी मूर्तीची स्थापना करण्यात मोलाची भूमिका पार पाडणाऱ्या सतीश हातमोडे,आशिष जाधव,समाधान पाटील,रोशन जंगम यांचे देखील आभार मानण्यात आले. पनवेल येथील शिवभक्तांनाशिवस्मारक तयारीसाठी लागणारे साहित्य नेण्यासाठी तब्बल तीन महिने लागले. आठवड्यातून, पंधरा दिवसांतून गड सर करत हे साहित्य पोहोचवून महाराजांची सिंहासनारूढ मूर्ती स्थापण्यात आली.

# जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद २०२५चे अलिबागेत आयोजन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील गुंतवणूकदार आणि व्यवसायांना एकत्र व्यासपीठ उपलब्ध करुन देणे, राज्याची अर्थव्यवस्था बळकट करण्याकरिता गुंतवणूक आकर्षित करणे, विकासाला चालना देणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे या उद्देशाने स्थानिक पातळीवर शासनाच्या उद्योग विभागाशी संलग्नित विभागांच्या सहाय्याने जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद–२०२५चे आयोजन दि.११ एप्रिल रोजी सकाळी ९:३० वा.पासून जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड–अलिबाग येथे जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली आहे.

या जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेस जिल्ह्यातील उद्योजक, नवउद्योजक, गुंतवणूकदार यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी. एस. हरळय्या यांनी केले आहे.

या गुंतवणूक परिषदेस श्रीमती.व्ही.एम. शिरसाठ, उद्योग सह संचालक,कोकण विभाग,ठाणे, संतोष थिटे, विभागीय अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पनवेल, जी.एस. हरळय्या, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र ,रायगड–अलिबाग तसेच शासनाच्या उद्योग विभागाशी संलग्नित विभागाचे अधिकारी रायगड जिल्ह्यातील औद्योगिक संघटनाचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

# कर्जतमधील जिल्हा परिषद शाळेत सीबीएसईची पहिली इयत्ता सुरू



**कर्जत: प्रतिनिधी**

देशभरातील जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमध्ये सीबीएसई दर्जाचे शिक्षण सुरू करण्यात येणार आहे. मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या माध्यमातून केंद्र सरकारने यशी घोषणा केली आहे, मात्र रायगड जिल्हा परिषदेच्या कर्जत तालुक्यातील कळंब येथील शाळेत हे शिक्षण सुरू झाले आहेत. ३५ मुलांनी पहिल्या इयत्तेत प्रवेश घेतला असून त्या सर्व विद्यार्थ्यांचा प्रवेश सोहळा पालक आणि शिक्षक तसेच ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत साजरा झाला.

केंद्र सरकारच्या धोरणानुसार रायगड जिल्ह्यात सर्वात आधी कर्जत येथील कळंब सारख्या ग्रामीण भागात सीबीएसई माध्यमाची शाळा सुरू होत आहे. या शाळेला केंद्र सरकारने पीएमश्री आदर्श केंद्र शाळा असा दर्जा दिला आहे. या शाळेत सेमी इंग्रजी माध्यमाचे वर्ग मागील वर्षापासून सुरू आहेत.

आज रायगड जिल्ह्यातील पहिली सीबीएसई माध्यमाची शाळा सुरू होत असताना कर्जत पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशांत पाटील, विस्तार अधिकारी राजपूत यांच्यासह शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रवींद्र बदे, उपाध्यक्ष सुनील बदे तसेच पालक महेश कोंडीलकर,खरेदी विक्री संघ संचालक अरुण बदे, शाळा व्यवस्थापन समिती माजी अध्यक्ष गणेश मानकामे यांच्यासह शाळेचे मुख्याध्यापक के. डी. राऊत आदी प्रमुख उपस्थित होते.

या माध्यमाच्या शैक्षणिक वर्ष २०२५ /२६ साठी प्रवेश मिळविलेल्या इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांचे मिरवणूक काढून स्वागत करण्यात आले. पहिली मध्ये प्रवेश घेणारे ३५ विद्यार्थी यांना ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय कळंब ते रायगड जिल्हा परिषद शाळा मराठी असे ढोल ताशांच्या गजरात तसेच लेझीमच्या ठेक्यावर आणि गुलाब पुष्पांचा वर्षावात मोठ्या आनंदात आणि उत्साहात स्वागत यात्रा काढून शाळेच्या आवारात आणण्यात आले. गटविकास अधिकारी सुशांत पाटील यांचे हस्ते या वर्गाचे उद्घाटन फित कापून झाले.

या वेळी सुशांत पाटील यांनी शाळा आणि परिसर पाहून अत्यंत समाधान व्यक्त करून ही शाळा जिल्हा परिषदेचे आहे एखादी कॉन्व्हेन्ट स्कूल सारखी दिसत असल्याचे गौवोद्गार काढले. रामदास टोणे अधिव्याख्याता पनवेल डाएट यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना नवीन शिक्षण पध्यातीचे महत्व समजावून सांगितले. याप्रसंगी शाळेचे शिक्षक आणि तालुका क्रीडा समन्वयक किशोर पाटील,यांनी सूत्रसंचालन केले. या पहिल्या शाळेच्या सीबीएसई माध्यमाचे शिक्षक एच के लोहकरे, सहदेव चव्हाण, जितेंद्र रोठे,लरुपेश मोरे, कल्पना गवारगुर, बाळकृष्ण पवार, सुनीता येंदे, हुमेरा दुर्राणी तसेच कोटक एज्युकेशनचे शामली तेरसे यांचे कर्जत पंचायत समिती कडून कौतुक करण्यात आले. पालक वर्गाकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

# उरणमधील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करा

## नागरिकांमधून मागणी; गंभीर समस्येमुळे नागरिकांसह प्राण्यांवर परिणाम

**उरण : प्रतिनिधी**

सिडकोकडे भूखंड आणि घनकचऱ्यावर प्रक्रिया करणारे प्रकल्प असूनही कचऱ्याची समस्या कायम आहे. समस्या कमी न होता यात दिवसेंदिवस वाढ होऊ लागली आहे. त्यामुळे उरण तालुक्यातील घनकचरा व्यवस्थापन लवकरात लवकर करण्यात यावे, अशी मागणी उरणच्या नागरिकांमधून होत आहे.

उरण शहर आणि तालुक्याला कचराभूमी नसल्याने कचरा समस्या गंभीर बनली आहे. त्यामुळे तालुक्यातील अनेक मुख्य मार्ग कचऱ्याने ओसंडून वाहू लागले आहेत. उरण तालुक्यातील अनेक गावात सांडपाणी व्यवस्थापन व कचरा व्यवस्थापनाच्या शून्य दिसून येत आहे. यामुळे ग्रामीण भाग त्याचबरोबर नव्याने निर्माण होणारा शहरी परिसरही बकाल दिसत आहे.



उरण तालुक्यातील जवळपास सर्वच गावातून गोळा करण्यात आलेला कचरा रहदारीच्या रस्त्यांवर टाकून या ग्रामपंचायतींनी रस्त्यांचे डंपिंग ग्राउंड केल्याची स्थिती आहे. या कचऱ्यामुळे नागरिकांसोबत मुक्या भटक्या प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. या कचऱ्याला दररोज आग लावली जात आहे. त्यामुळे प्रदूषणचा धोका ही वाढला आहे. निसर्ग संपन्न डोंगर रांगांच्या गर्द हिरव्या छायेत वसलेला उरण तालुका हा मुंबई व नवी मुंबई शहरापासून अगदी हाकेच्या अंतरावर आहे, मात्र या तालुक्यात असणाऱ्या ग्रामपंचायतींच्या हद्दीतील कचरा रहदारीच्या रस्त्यांवर टाकला जात आहे. त्यामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांचा श्वास कोंडला जात आहे.

सध्या मोठ्या प्रमाणात केर कचरा हा चिरनेर, कोप्रोली, चिर्ले, दिघोडे, पिरवाडी-चारफाटा, नवघर, बोकडविरा, द्रोणागिरी नोड, पाणदिवे, पिरकोन सारडे व वशेणी, चाणजे, नागाव अशा गावांतील रस्त्यांवर टाकला जात आहे. या कुजलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरते. त्यामुळे या दुर्गंधीने साथीचे रोग पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. एकीकडे शासन स्वच्छ भारत अभियान राबवत आहे तर दुसरीकडे या अभियानाला हरताळ फासण्याचे काम उरण तालुक्यात होत आहे. अनेक गावात सांडपाणी व्यवस्थापन नसल्याने गावागावांतून सांडपाणी वाहत असल्याचे चित्र आहे.

महसूल विभाग, पंचायत समिती प्रशासनसुद्धा ग्रामपंचायतींच्या या अस्वच्छ कारभाराला प्रतिबंध करीत नसल्याने जनतेत संताप व्यक्त होत आहे. उरण तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतींनी सिडकोने घनकचरा प्रकल्प उभारणीसाठी भूखंड द्यावा अशी मागणी केली आहे, मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही. उरण तालुक्यातील कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यासाठी पंचायतकडून पाहणी करून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती उरण पंचायत समितीकडून देण्यात आली आहे.


उरणच्या द्रोणागिरी सेक्टर ११ मधील घनकचरा प्रक्रिया प्रकल्प सुरू आहे. तर जासई येथील प्रकल्प बंद असल्याची माहिती सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रिया रातांबे यांनी दिली आहे.

### ‘पाहणीनंतर निर्णय घेणार‘

उरणमधील अनेक ग्रामपंचायतींनी सिडकोने घनकचरा प्रकल्प उभारणीसाठी भूखंड द्यावा, अशी मागणी केली आहे, मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही. उरण तालुक्यातील कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्यासाठी पंचायत कडून पाहणी करून निर्णय घेण्यात येईल, अशी माहिती उरण पंचायत समितीकडून देण्यात आली आहे.

## निवडक

### गव्हाण गावातून एक जण बेपत्ता



**पनवेल :** गव्हाण गावातील एक ७५ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हरवले असून त्यांच्या संदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. धनाजी धाया कोळी असे त्यांचे नाव असून त्यांचा रंग सावळा, उंची - ५.७ आहे. ते ३१ मार्च २०२५ रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास मच्छी पकडण्यासाठी जेएनपीटी ते वाशी परिसरात गेले होते, पण दुर्दैवाने ते अद्यापही घरी परत आले नाहीत. त्यामुळे त्यांच्या संदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी ७९७७९९५९४१ अथवा ९५९४९५७७४२ या क्रमांकावर किशोर धनाजी कोळी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रवाशांच्या सामानाची चोरी

**पनवेल :** एर्नाकुलम एक्स्प्रेसमध्ये घुसलेल्या एका लुटारूने दोन महिला प्रवाशांच्या किमती वस्तू चोरल्याची घटना पनवेल रेल्वेस्थानकात घडली. पनवेल रेल्वे पोलिसांनी या चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. गोवा येथे राहणाऱ्या सपना साळुंखे (वय ५१) या दोन नातेवाइकांसह एर्नाकुलम एक्स्प्रेसने मवगाव येथून पुण्याला जात होत्या. त्यांची गाडी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास पनवेल रेल्वेस्थानकात थांबून सुटल्यानंतर एस-११ या बोगीमध्ये घुसलेल्या एका लुटारूने सपना साळुंखे यांचे दोन मोबाईल फोन, रोख रक्कम, चार्जर, हेडफोन असलेली शोल्डर बॅग खेचली व पलायन कले. त्यानंतर सपना साळुंखे यांच्या सोबत असलेल्या अनुषा तामसे या झोपेतून जागे झाल्या असता, त्यांचासुद्धा मोबाईल फोन, रोख रक्कम, आधार कार्ड, डेबीट कार्ड असलेली बंग चोरीला गेल्याचे निदर्शनास आले.

# करंजाडेत लवकरच नवीन पोलीस ठाणे -ना. योगेश कदम

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे वसाहतीमध्ये वाढते लोकसंख्या लक्षात घेता या परिसराला नवीन पोलीस ठाण्याची निर्मिती करावी या मागणसाठी मंत्रालयात योगेश कदम गृह (शहरी) महसूल, ग्रामीण विकास व पंचायत राज, अन्न नागरि पुरवठा व ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासकीय विभाग राज्यमंत्री यांची भेट घेऊन निवेदन दिले.



या वेळी स्वतंत्र पोलीस ठाणे करंजाडे वसाहतीमध्ये लवकरच उभारण्यात येणार असे आश्वासन मंत्री महोदयांनी दिली. या वेळी उपतालुका प्रमुख गौरव गायकवाड, शिवसेना शहर संघटक स्वप्निल मोरे उपस्थित होते.

# करंजाडेतील युवा कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे वसाहतीमध्ये डॅशिंग उपतालुका प्रमुख गौरव गायकवाड यांच्या सहकार्याने मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या उपस्थितीत युवा कार्यकर्त्यांचा जाहिर पक्षप्रवेश करण्यात आल.



करंजाडे वसाहतमध्ये महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून करंजाडेतील उपतालुका प्रमुख गौरव सुरेश गायकवाड यांच्या सहकार्याने वडघर जिल्हा परिषदमधील अनेक युवा कार्यकर्त्यांचा खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या नेतृत्वाखाली समाधान परदेशी, रोहीत वैराळे, जिगर परदेशी, अमोल लांडगे, चाणक्य, परशुराम कांबळे, सचिन दिपके, राम गवळी, रवी गवळी, निलेश आंबोरे, आलंतमश तुपके, वसिम शेख, गणेश कांबळे यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी जिल्हा प्रमुख अतुल भगत, उरण संपर्क प्रमुख रमेश म्हात्रे, जिल्हा प्रमुख पनवेल विधानसभा, रामदास शेवाळे, मेघाताई दमबडे, विनोद साबळे, जिल्हा प्रमुख उरण विधानसभा सचिन, हितेश नाईक, रघुनाथ पाटील, रुपेश ठोंबरे, बाळासाहेब नाईक, चंद्रकांत गुजर साहेब, स्वप्निल मोरे मिरेंद्र शहारे व सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# आगीच्या घटनांमध्ये वाढ

**पनवेल :** घर, दुकाने व इतर ठिकाणी घडलेल्या आगीच्या घटना प्रामुख्याने शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या दिसून येत आहेत. त्यात गेल्या काही दिवसांपासून वाढत्या तापमानामुळे घरातील बंद एसी, कूलर आणि पंखे सतत चालू असतात. उन्हाळ्यात विजेचा भार खूप जास्त असतो.

जास्त वीज वापरामुळे विजेच्या तारा गरम होतात. त्यानंतर आग लागण्याच्या घटना घडतात. त्यामुळे नागरिकांनी सोसायटीमधील घरातील उपकरणाच्या वायरी तसेच सोसायटीमधील अग्निमशन यंत्रणेची तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचे खारघर अग्निशमन केंद्राचे अधिकारी सौरभ पाटील यांनी सांगितले.

उन्हाळ्यात वीज यंत्रणेवर लोड वाढतो. त्यामुळे शॉर्टसर्किट होते आणि आगीच्या घटना घडतात. त्यामुळे नागरिकांनी आपल्या घरातील पंखे, एसी किंवा कूलर आदींच्या वायरची तपासणी करणे आवश्यक आहे.

# कळंबोलीतील आरटीओ कार्यालयाचे खारघरमध्ये स्थलांतरण

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील प्रादेशिक परिवहन विभागाचे खारघर येथील व्हॅली शिल्प इमारतीत स्थलांतर करण्यात आले आहे. या कार्यालयाचे कामकाज एप्रिलअखेर अथवा मेच्या पहिल्या आठवड्यात सुरू होणार आहे.

पनवेल प्रादेशिक परिवहन विभागाने २०१०-११ पासून कळंबोली येथील केंद्रीय सुविधा भवन कार्यालय भाडेतत्त्वावर सुरू केले होते; मात्र ही इमारत मोडकळीस आली असून, त्यामध्ये वारंवार पडझड होत असल्याने कार्यालयीन अधिकारी, कर्मचारी व कार्यालयात कामानिमित्त ये-जा करणाऱ्यांना धोका निर्माण झाला होता. विशेष म्हणजे या इमारतीला लोखंडी रॉडचा टेकू देण्यात आला आहे. पनवेल महापालिकेने ही इमारत धोकादायक घोषित करून नोटीस बजावल्याने प्रादेशिक परिवहन कार्यालय इतरत्र स्थलांतरित करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने सिडकोने खारघर सेक्टर ३६ मधील सिडकोच्या व्हॅली शिल्प सोसायटीतील आठ दुकान गाळ्यांची जागा भाडेतत्त्वावर मंजूर केली आहे.

खारघरमधील व्हॅली शिल्प सोसायटीच्या आठ गाळ्यांमध्ये आरटीओ कार्यालय स्थलांतरित होणार आहे. सेक्टर ३६ येथील इमारत नं. एच १मधील दुकान गाळा क्र. १०१, १०२, १०३, १०४, २०१, २०२, २०३ आणि २०४ या आठ गाळ्यांत १,११२.७६ चौरस मीटर जागा भाडेतत्त्वावर मंजूर केली आहे. उपप्रादेशिक परिवहन विभागाने सिडकोकडे अनामत रक्कम भरून भाडे करार केला आहे. यासाठी ११ महिन्यांचे ४६ लाख ६४ हजार ७३५ रुपये भाडे द्यावे लागणार आहे. पनवेल उपप्रादेशिक कार्यालयासाठी सिडकोकडून मिळालेल्या जागेची अनामत रक्कम भरणा करून करार करण्यात आला आहे.

या दुकान गाळ्यांची स्वच्छता, रंगरंगोटी, विद्युतवाहिनी जोडणी आदी कामे सुरू केली आहेत. काम पूर्ण होताच एप्रिलअखेर अथवा मेच्या पहिल्या आटवड्यात आरटीओ कार्यालय नियमिपणे सुरू राहील, अशी माहिती परिवहन अधिकारी जयंत पाटील यांनी दिली.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे स्वीय सहाय्यक दत्ता कुऱ्हाडे यांना वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी.देशमुख तसेच अमित जाधव, राजू झांबरे, संजय कोळी, संतोष पाटील आदी उपस्थित होते.**

# ट्रकच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पतीसोबत दुचाकीने पनवेल येथून कामोठे येथे जाणाऱ्या दाम्पत्याच्या दुचाकीला ट्रकचा धक्का लागून झालेल्या अपघातात ही महिला ट्रकच्या चाकाखाली येऊन तिचा जागीच मृत्यू झाल्याची घटना कळंबोली सर्कल येथे घडली.

संगीता चंद्रकांत बेल्लुरकर (वय ४८) असे या महिलेचे नाव असून, त्या कुटुंबासह-पनवेलमधील खानाव गाव येथे राहात होत्या. संगीता या पतीसह स्कूटरवरून पनवेलकडून कामोठे येथे जात होत्या. या वेळी त्या कळंबोली सर्कल येथे सिग्नलमुळे थांबल्या होत्या, मात्र सिग्नल सुरू झाल्यावर एका ट्रकचालकाने अचानक डाव्या बाजूला वळण घेतले. त्यामुळे ट्रकचा धक्का त्यांच्या दुचाकीला लागला, त्यामुळे त्यांचे पती चंद्रकांत हे दुचाकी बाजूला घेत असताना संगीता खाली पडल्या व ट्रकच्या चाकाखाली आल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघातानंतर कामोठे पोलिसांनी ट्रकचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.





**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप तालुका सरचिटणीस भूपेंद्र पाटील तसेच अंकुश पाटील, प्रवीण मोरबाळे, रूपेश नागवेकर, शुभम पाटील, प्रद्युम खुटले आदी उपस्थित होते.**

# पनवेलच्या देवश्री शेडगेचा विदेशात डंका

## कम्प्युटर क्राऊडमध्ये केले मास्टर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुका प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे यांची कन्या देवश्री प्रशांत शेडगे ही गेले वर्षभर आयरलंड येथे कम्प्युटर क्राऊड मास्टरच्या उच्च शिक्षणासाठी गेले वर्षभर वास्तव्यास होती.

अनुकूल परिस्थितीमध्ये शिक्षण घेत पदवी प्राप्त करून पनवेलच्या शिरपेजात मानाचा तुरा रोवला असून समाजातील सर्व स्थरातून देवश्रीवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पनवेल येथे पिल्लई महविद्यालयात



कम्प्युटर सायन्सचे शिक्षण पूर्ण केल्यावर अजून पुढचे शिक्षण करण्याची जिद्द उराशी बाळगून परदेशात शिक्षण घेण्यासाठी प्रचंड परिश्रम करून आयरलंड येथील डब्लीन युनिवरसिटीमध्ये क्राऊड कम्प्युटरसाठी प्रवेश घेतला. त्यानंतर कठोर परिश्रम करत मास्टर डिग्री संपादन करून परिवाराचे स्वप्न साकार केले.

हे आनंदाचे वृत्त समजताच तिच्या वर कौतुकाचा वर्षाव होत असून माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि समाजातील इतर प्रतिष्ठित व्यक्तींकडून तिचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# स्लॅब पडून सात कामगार जखमी

**पनवेल :** शहरातील स्वामी नित्यानंद मार्गावरील पुनर्बांधणीचे काम सुरू असलेल्या कैलास पार्क सोसायटीचा आठव्या मजल्याचा स्लॅब कोसळला. यात सात कामगार जखमी झाले आहेत.

बांधलेल्या संरक्षक जाळीमुळे तिसऱ्या मजल्यावर हा स्लॅब कोसळून त्यामध्ये सात कामगारांना हात-पाय व डोक्याला जखमा झाल्या आहेत. त्यातील दोन कामगार गंभीर जखमी असून त्यांना तातडीने उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच शहर पोलीस व अग्नीशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहचले.

# सीकेटी कॉलेजमध्ये ऑन-कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस् , कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे प्लेसमेंट सेल व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संयुक्त विद्यमाने ऑन-कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हचे आयोजन बुधवारी (दि.९) करण्यात आले होते.



या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये S.H. Kelkar, NIIT HDFC, Indoscot Global School, KCIL Global, Tachnowin, SPRK Technologies, HDB Financial Services सारख्या आय.टी., बँकिंग, केमिकल, उत्पादन, लॉजीस्टिक, शिक्षण क्षेत्रातील एकूण २० कंपन्यांनी सहभाग नोंदविला. या प्लेसमेंट ड्राइव्हचा महाविद्यालयातील विविध विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रो.डॉ. बी. डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. एस.एस.कांबळे, ट्रेनिंग आणि प्लेसमेन्ट ऑफिसर आरती कागवाडे आणि प्लेसमेंट सेलच्या इतर सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय


# ठोस पर्याय हवा

यंदाच्या गणेशोत्सवात पीओपी बंदीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. परंतु मूर्ती घडवणाऱ्या हजारो कारागीरांचा रोजगार यातून हिरावला जाईल या मुद्यावर मूर्तिकार संघटना पीओपी बंदीचा निर्णय मागे घेण्याची मागणी करीत आहेत. आता तर पेणसारख्या ठिकाणांहून मुंबईत येणाऱ्या पीओपी मूर्तींना रोखण्याचे प्रयत्नही सुरू झाले आहेत.

**मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार येत्या गणेशोत्सवात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या बंदीच्या कठोर अंमलबजावणीसाठी मुंबईसह अनेक महापालिकांनी मूर्तिकारांवर कडक निर्बंध लागू केले आहेत. सरकार प्रदूषण टाळण्याच्या बाजूनेच आहे. पण मूर्तिकार, कारागीर आणि गणेशोत्सव मंडळांच्या अडचणीही समजून घेतल्या जाण्याचा सरकारचा प्रयत्न आहे असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वी सांगितले आहे. पर्यावरणाचे रक्षण करण्याच्या गरजेवर भर देताना, पीओपी वापरून मूर्ती साकारण्याचा मूलभूत अधिकार मूर्तिकारांना नसल्याची टिप्पणी उच्च न्यायालयाने अलीकडेच केली होती. त्यानंतर मुंबईत कार्यशाळांमध्ये पीओपीच्या मूर्ती घडवण्यावर बंदी आणली गेली. तसेच पाठोपाठ मुंबई महापालिकेने कोकण विभागीय आयुक्तांना पत्र पाठवून मुंबईत बाहेरून येणाऱ्या पीओपी मूर्तींवर निर्बंध आणण्यासाठी कार्यवाही करण्यासही सांगितले आहे. मुंबईत रायगड, ठाणे व सिंधुदुर्ग जिल्ह्यातून पीओपीच्या गणेशमूर्ती येत असतात. मात्र तेथील मूर्तीकारांनीही पीओपीच्या मूर्ती घडवू नयेत आणि मुंबई शहरात विक्रीसाठी पाठवू नयेत यासाठी मुंबई महापालिकेने नियोजन सुरू केले आहे. मार्च महिन्यातच त्यासाठीचे पत्र कोकण विभागीय आयुक्तांना पाठवले गेले. एकट्या पेण, हमरापूर भागातून लाखभराहून अधिक पीओपी गणेशमूर्ती मुंबईत येतात. या भागातील जवळपास १५ ते २० हजार लोकांचा रोजगार यावर अवलंबून आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पीओपीच्या मूर्तींवर २0२0 मध्येच बंदी घातली. परंतु अद्याप या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. अलीकडेच उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर पीओपीबंदीचा निर्णय लागू करण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून सुरू आहे. माघी गणेशात्सवातही ही बंदी लागू करण्याचा प्रयत्न झाला. माघी गणेश जयंती उत्सवात पीओपी गणेशमूर्तींची कुठेही विक्री होऊ देऊ नका. ती झाली असल्यास त्या मूर्तींचे विसर्जन करू देऊ नका असे आदेश उच्च न्यायालयाने ३० जानेवारी रोजी प्रदूषण नियंत्रण मंडळ, राज्य सरकार व मुंबई महापालिकेसह अन्य महापालिकांना दिले होते. आता भाद्रपदातील अधिक व्यापक गणेशोत्सवातही पीओपी बंदीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुंबईत पर्यावरणपूरक मूर्ती तयार करणाऱ्या मूर्तिकारांना मंडपासाठी परवानगी दिली जाईल. तसेच विनामूल्य शाडूची मातीही दिली जाणार आहे. परंतु या शाडूच्या मातीतून प्रत्यक्ष मागणीच्या केवळ चार ते पाच टक्केच गणेशमूर्ती घडवणे शक्य होऊ शकेल असे मूर्तीकारांचे म्हणणे आहे. आता गणेशोत्सवाला जवळपास चारच महिने उरले असल्याने या संदर्भात सर्वच संबंधितांची चिंता वाढली आहे. मुंबईत जवळपास दोन लाख घरगुती गणपतींच्या मूर्तींची स्थापना होते तर सार्वजनिक गणेश मंडळांमधून तब्बल १८ हजार गणेशमूर्तींची स्थापना होते. या दोन्हींपैकी जवळपास ९५ टक्के मूर्ती पीओपीच्या असतात. सध्या पीओपीच्या पेचाबाबत राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगाच्या तज्ज्ञ समितीकडून अभ्यास सुरू असून पीओपीला काही ठोस पर्याय मिळावा याचाही प्रयत्न केला जातो आहे. गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील मोठा सण असून तो पारंपरिकपणे साजरा करण्यात अडथळा येऊ नये अशी सगळ्यांचीच भावना आहे.**

# घरटे बांधण्यासाठी कावळ्यांची लगबग






सर्व पक्ष्यांतील चतुर पक्षी म्हणजे कावळा. मानवी वस्तीत राहून तो जास्तच हुशार झालेला दिसतो. सध्या उन्हाळा सुरू आहे. मनुष्यवस्तीत राहणाऱ्या व मनुष्याशी एकरूप झालेल्या या पक्ष्याचा विणीचा हंगाम सुरू झाला आहे. पावसाळ्याआधी या कावळ्यांचा विणीचा हंगाम असल्याने सध्या कावळ्यांची चोचीतून घरटी बांधण्याची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे सध्या जिथे पाहावे तिथे कावळा व कवळी चोचीत काड्या, तारा, प्लास्टीक पट्ट्या, दोरे, वायर्स घेऊन उडताना दिसत आहेत.

कावळा हा पक्ष्यांमध्ये सर्वात हुशार पक्षी. काळानुरूप व बदलत्या परिस्थितीनुसार या पक्ष्याने आपल्या सवयीही मनुष्याप्रमाणे बदलून घेतल्या आहेत. असे कोणतेही अन्न नाही की ते कावळा खात नाही. कोणत्याही प्रकारचे किडे, मांस, मानवी अन्न व मानवी विष्ठा देखील कावळा खातो. ऋतू कोणताही असो इतर पक्ष्यांसारखी खाद्याची साठवणूक करणे कावळ्याला जमत नाही. त्यामुळे रोज नवीन खाद्याच्या शोधात हा पक्षी दिसतो. सध्या मे महिना म्हणजेच तीव्र उन्हाळा सुरू असून पावसाची चाहूल काही दिवसांतच लागेल. साधारण एप्रिल शेवट व मे महिन्याच्या सुमारास कावळ्यांचा विणीचा हंगाम समजला जातो. त्यावेळेस कावळे घरटे बांधतात. त्यामुळे नेहमी आपल्या अन्नाकडे म्हणजेच कीटक, छोटे प्राणी, कबुतरे व चिमण्या या सावजांकडे लक्ष ठेवून तासनतास वाट बघत बसलेला कावळा आता घरटे बांधण्यात व्यग्र आहे. ही घरटी शक्यतो मानवी वस्तीच्या जवळ बांधली जातात. मनुष्याच्या जवळ जात घरटे बांधणारा कबुतरे व चिमण्यांसोबत कावळ्याची देखील गणना होते. साधारण जमिनीपासून ३ ते ५ मीटर अंतरावर कावळे घरटे बांधतात. इतर पक्ष्यांसारखी लहान काड्या व विणकाम केलेली घरटी करणे कावळ्याला जमत नसले तरी त्यातल्या त्यात मजबूत घरटे बांधण्याकडे कावळ्याचा कल असतो. मोठ्या काड्या, तारा, प्लास्टीक पट्ट्या, दोरे, वायर्स याचा पुरेपूर वापर केलेला कावळ्यांच्या घरट्यात आढळून येतो. इथे प्रश्न पडतो की, काड्या, तारा या कावळ्यांना किंवा त्यांच्या पिल्लांना टोचत नसाव्यात का? तर त्याचे उत्तर आहे नाही. कारण घरटे बनवताना ते पूर्णत्वास येताना कावळा व कावळी त्या घरट्यात बसून त्या घरट्यातील काट्या व तारा टोचणार नाहीत अशा पद्धतीने रचना तयार करतात. इतर पक्ष्यांसारखे गोलाकार न करता काहीसे पसरट घरटे कावळे तयार करतात. मात्र ते तितकेच भक्कम बनवले जाते. अंडी किंवा पिल्ले पडणार नाहीत याची काळजी घेतली जाते. झाडांवर असलेले इतर पक्षी व प्राण्यांचे धोके पाहता कावळा शक्यतो झाडांवर घरटे बांधत नाही. मानवी वस्तीत असलेल्या झाडावर, खिडकी, ग्रिलमध्ये घरटे बांधतो. यामागे अंड्यांची व पिल्लांची सुरक्षितता हा भाग असतो. तसा कावळा मोठा हुशार पक्षी आहे. घरटे बांधताना आपला जोडीदार काट्या काटक्या गोळा करायला गेल्यावर दुसरा जोडीदार आपल्या तयार होणाऱ्या घरट्यावर लक्ष ठेवून असतो. आपल्या घरट्याला धोका पोहोचू नये ही त्यामागची भूमिका. मनुष्याचा धोका दिसताच मात्र दोन्ही कावळे काव काव करत धोक्यावर तुटून पडतात. इतर पक्ष्यांमध्ये मोठा असल्याने कावळ्यांची काहीशी भीती वाटते. त्यामुळे मानवाने सावध राहणे गरजेचे आहे. अनावधनाने घरट्याच्या जवळ जरी मनुष्य गेले तरी चोची मारण्यास कावळे सरसावतात.

साधारण जून महिन्यात कावळीण ४ ते ५ अंडी देते. अंडी हिरवट निळ्या,मोरपीसी रंगाची असतात. ३ ते ४ आठवड्यांत या अंड्यांतून पिल्ले बाहेर येतात.कर्णकर्कक्ष आवाजात काव काव करण्यास सुरुवात होते. या दरम्यान कावळे कोणासही आपल्या घरट्याजवळ फिरकू देत नाहीत. कबुतर चिमणी सोडाच पण खुद्द आपल्या जातीतील इतर कावळ्यांना घरट्यांजवळ येण्यास मनाई असते. चुकून एखादा पक्षी किंवा माणूस या घरट्याजवळ गेल्यास त्याला कावळ्यांच्या चोचीचा अथवा पायांचा प्रहार सहन करावा लागतो. इतके बारीक लक्ष हे कावळे आपल्या अंड्यांवर व पिल्लांवर ठेवतात, मात्र या कावळ्यांना एकच पक्षी फसवतो व आपले हित साध्य करतो. तो म्हणजे कोकीळ. कोकिळ पक्षाचा हाच काळ अंडी देण्याचा असतो. स्वतःचे घरटे बनवण्यात हा पक्षी आळशी असल्याने अनेकवेळा कावळ्यांच्या घरट्यांत या पक्षाची अंडी दिसतात. अंड्यांच्या रंगात साधर्म्य असल्याने कवळीणीला ही ती ओळखू येत नाहीत. त्यामुळे कावळी आपल्या अंड्यांबरोबरच कोकिळेच्या अंडयाना मायेने ऊब देते.

अगदी पिल्ले उडण्याएवढी सक्षम झाली तरीही कवळीणीला कोकिळेची पिल्ले ओळखत येत नाहीत. त्यातून पिल्ले बाहेर आली तरी कावळीं आपल्या पिल्लांबरोबरच या पिल्लांचे संगोपन करते. सांगोपन करताना नर कावळा पिल्लांना खाणे आणून देतो.

**अंधश्रद्धा व कावळे हे समीकरण तुटणार कधी?**

हिंदू धर्मात याबाबत अनेक अंधश्रद्धा आहेत. कावळ्याचे घरटे ज्या घरावर होते तेथे आजारांचे सावट येते असे मानले जाते. त्यामुळे कावळ्यांच्या घरट्याला मनुष्य अपल्या घराजवळ स्थान देत नाही. म्हणून केलेली घरटे पाडतो. कावळा इतका जिद्दी पक्षी आहे की घरटी काढून मनुष्य थकतो मात्र कावळा आपले प्रयत्न सुरूच ठेवतो. त्यात कावळा यशस्वी होतो. त्यामुळे अनेक घरटी मानवी वस्तीत पाहायला मिळतात. मात्र या कावळ्याचे दुर्दैव असे की, कावळा पिंडाला शिवावा म्हणून मनुष्य तासनतास वाट पाहतो, मात्र कावळ्याचे घरटे मनुष्याला आपल्या घरातील परिसरात नको असते.

**संकलन : सिद्धेश प्रधान**



## बदलते तंत्रज्ञान

### हिरो एक्स्ट्रीम १२५आर सिंगल सीट व्हेरिएंट लाँच

हिरो मोटोकॉर्पने भारतीय बाजारात एक्सट्रीम १२५आर चा सिंगल-पीस सीट प्रकार लाँच केला आहे. त्याची एक्स-शोरूम किंमत १,००,१०० रुपये ठेवण्यात आली आहे, जी स्प्लिट-सीट एबीएस व्हेरिएंटच्या बरोबरीची आहे.या प्रीमियम कॉम्प्युटर बाईकमध्ये सिंगल चॅनेल एबीएससह डिस्क ब्रेक आहेत.



डिझाइन: सर्व एलईडी लाइटिंग आणि ३ रंग पर्यायआहेत

हायपर-स्टायलिश डिझाइनसह, नवीन हिरो एक्सट्रीम १२५आरला एक तीक्ष्ण, स्पोर्टी आणि आक्रमक लूक देण्यात आला आहे. बाईकला अँगुलर टँक एक्सटेंशन, स्लिम टेल सेक्शन आणि लहान एक्झॉस्ट देण्यात आले आहे, ज्यामुळे तिचा लूक स्पोर्टी बनतो. ही मोटरसायकल ३ रंगांच्या पर्यायांमध्ये उपलब्ध आहे हिरो एक्स्ट्रीम १२५आर ही डायमंड प्रकारच्या फ्रेमवर बनवली आहे आणि बॉक्स-सेक्शन स्विंगआर्मसह येते. आरामदायी रायडिंगसाठी, बाईकच्या पुढच्या बाजूला पारंपारिक टेलिस्कोपिक फोर्क्स सस्पेंशन आणि मागील बाजूला ७-स्टेप अॅडजस्टेबल हायड्रॉलिक मोनोशॉक अॅब्सॉर्बर आहे.

ब्रेकिंगसाठी, बेस मॉडेलमध्ये कम्बाइंड ब्रेकिंग सिस्टम सह २४० मिमी फ्रंट डिस्क ब्रेक आहेत, तर स्प्लिट-सीट आणि नवीन सिंगल-पीस सीट -इड आवृत्त्यांमध्ये सिंगल चॅनेल -इड सह २७६ मिमी फ्रंट डिस्क ब्रेक आहेत, तर सर्व प्रकारांमध्ये मागील बाजूस १३० मिमी ड्रम ब्रेक आहेत.

इंजिनला वेट मल्टी-प्लेट क्लचसह ५-स्पीड कॉन्स्टंट मेश गिअरबॉक्सशी ट्यून केले आहे. कंपनीचा दावा आहे की ही बाईक फक्त ५.९ सेकंदात ०-६० किमी प्रतितास वेग गाठू शकते आणि तिचे प्रमाणित मायलेज प्रति लिटर ६६ किमी आहे.

हिरो एक्सट्रीम १२५आर हेडलाइट युनिट आणि पूर्ण एलईडी लाइटिंग सेटअप आहे. बाईकमधील टँक एक्सटेन्शन खूपच तीक्ष्ण आहे. अँगल केलेले साइड पॅनल्स, हाय-सेट टेल सेक्शन आणि टायर हगर यामुळे बाईक स्पोर्टी दिसते.याशिवाय, बाईकमध्ये स्प्लिट पिलियन ग्रॅब रेलची सुविधा आहे. इन्स्ट्रुमेंट कन्सोल ब्लूटूथ कनेक्टिव्हिटी आणि टर्न-बाय-टर्न नेव्हिगेशन, कॉल आणि एसएमएस अलर्टसह वेग आणि इंधन पातळीची माहिती देते.

# शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख



**निमित्त**

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा आज (१० एप्रिल १९६५) स्मृतिदिन. भारताचे पहिले कृषिमंत्री तसंच शिक्षणमहर्षी म्हणून त्यांची ओळख सर्वपरिचित आहे. पंजाबरावांनी १९५२ ते १९६२ या १० वर्षांच्या कालावधीत भारताचे कृषिमंत्री म्हणून काम पाहिलं.

या काळात त्यांनी कृषी विभागाअंतर्गत अशा अनेक योजना सुरू केल्या ज्यामुळे कृषी क्षेत्राच्या विकासाला गती मिळाली.

शेतीला विज्ञानाची जोड देऊन आधुनिक पद्धतीनं शेती करण्यास त्यांनी शेतकऱ्यांना प्रवृत्त केलं.

डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जन्म २७ डिसेंबर १८९८ रोजी अमरावती जिल्ह्यातील पापळ या गावी झाला.पंजाबरावांचे यांचे वडील शामराव देशमुख हे शेती करत. त्यामुळेच बालपणापासून पंजाबरावांना शेतीविषयी प्रेम होतं.प्राथमिक शिक्षण गावात घेतल्यानंतर ते पुढे माध्यमिक शिक्षणसाठी अमरावतीला आले. महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी पुण्याच्या 'फर्ग्युसन कॉलेज' इथून पूर्ण केलं.१९२१ मध्ये इंग्लंडच्या केंब्रीज विद्यापीठातून 'बॅरिस्टर पदवी' उत्तीर्ण केली. येथेच त्यांनी संस्कृतमध्ये एम.ए. आणि पी.एच.डी.ची पदवी घेतली.इंग्लंडमधील शिक्षणानंतर ते अमरावतीला परत आले.

डॉ. पंजाबरावांच्या कारकिर्दीतली एक घटना अशी आहे, ज्यात त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे हजारो शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराच्या तावडीत जाण्यापासून वाचल्या.१९२० नंतर कापूस बाजारात मंदीची प्रचंड लाट आली. कापसाचा भाव २५० रुपयांवरून २५ रुपयांवर आला. त्यापूर्वीच्या १९१८ च्या दुष्काळाने शेतकरी आधीच संकटात सापडला होता. सावकार कोर्टात 'डिक्री' (कायदेशीर आदेश) मिळवून शेतकऱ्याच्या घरातील भांडीकुंडी, बैल, म्हशी जप्त करून त्रास देऊ लागले.या पार्श्वभूमीवर पंजाबरावांनी कर्ज लवाद बिल मांडले.या विधेयकाचे स्वरूप अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण होतं. खरं पाहिल तर हा शेतकरी वर्गाच्या कर्जमुक्तीचाच कायदा होता. अस्मानी, सुलतानी आणि सावकारी संकटांतून त्यांनी शेतकऱ्याला कायदेशीररीत्या मुक्त केले, अभयदान दिले.

पंजाबरावांनी १९२७ मध्ये मुंबईच्या सोनार जातीतील विमलाबाई वैद्य या तरुणीशी लग्न केलं. त्यामुळे विदर्भात विशेषतः मराठा समाजात खळबळ उडाली. विमलाबाई लग्नानंतर बी. ए. एल्एल. बी. चं शिक्षण पूर्ण केलं. त्यांचा अनेक स्त्री संघटनांशी निकटचा संबंध होता. पुढे त्या राज्यसभेवरही निवडून आल्या. १९५५ साली पंजाबरावांनी 'भारत कृषक समाजा'ची स्थापन केली. या संस्थेमार्फत कृषीविषयक परिषदा, मेळावे आणि प्रदर्शनं भरवली. केंद्रीय कृषिमंत्री असताना डॉ. पंजाबरावांनी १९६० मध्ये दिल्ली येथे जागतिक कृषी प्रदर्शन भरविण्यात आले. अंदाजे १०० एकर जागेत हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे कृषी प्रदर्शन भारताच्या कृषी क्रांतीच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले.

१९६५मध्ये पंजाबरावांना पक्षाघाताचा झटका आला आणि दिल्ली येथे १० एप्रिल १९६५ रोजी त्यांचं हृदयविकारानं निधन झालं. त्यांच्या स्मरणार्थ अकोला इथं डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ स्थापन करण्यात आलं.


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### घामाची दुर्गंधी दूर करण्याचे उत्तम उपाय

उन्हाळा सुरू झाला की, घामामुळे लोक हैराण होतात. सोबतच घामाच्या दुर्गंधीमुळे त्यांना आणि इतरांनाही त्रास होते. अशात चार चौघात जाण्यासही भिती वाटते. त्यामुळे घामाच्या दुर्गंधीची समस्या दूर करण्यासाठी आम्ही काही घरगुती उपाय तुम्हाला सांगणार आहोत...



आधी जाणून घेऊया घामाच्या दुर्गंधीची कारणे. फार जास्त मसालेदार पदार्थ खाल्ल्यानेही शरीराची दुर्गंधी येऊ लागते. त्यामुळे उन्हाळ्यात जास्त मसालेदार पदार्थ खाणे टाळावेत. तणाव असल्यावर शरीरातून घाम अधिक निघतो. यादरम्यान शरीरात कॉर्टिसोल हार्मोन अधिक रिलीज होतात.

ज्यामुळे असं होतं. जास्त प्रमाणात निघालेला घाम जेव्हा बॅक्टेरियाच्या संपर्कात येतो तेव्हा दुर्गंधी येऊ लागते. जर तुम्ही फार जास्त औषधे घेत असाल तर याचा प्रभाव तुमच्या शरीरावरही होतो. औषधांमधील रासायनिक तत्व शरीराच्या गंधाला प्रभावित करतात. अशात घाम आणि शरीराचा गंध मिळून दुर्गंधी निर्माण होते.

आंघोळीच्या पाण्यात काही थेंब गुलाबजल टाका. गुलाबजल एक नॅचरल कुलर आहे. यामुळे तुम्हाला फ्रेश वाटेल. तसेच तुम्ही घामाची दुर्गंधी दूर करण्यासाठी अंडरआर्ममध्ये बटाट्याच्या स्लाइसने रब करा. यानेही दुर्गंधी जाते.

आंघोळीच्या पाण्यात थोडी तुरटी फिरवा किंवा पदीन्याची पाने बारीक करून टाका. यानेही घामाची दुर्गंधी दूर होण्यास मदत मिळते.

बेकिंग सोड्याचा तुम्ही टॅल्कम पावडरच्या रूपात वापर करू शकता. बेकिंग सोडा एक पाण्यात मिक्स करा आणि हे पाणी, काखेत, पायांच्या बोटांच्या मधे लावा. यासाठी एक कप पाण्यात दोन चमचे बेकिंग सोडा टाका. कपडे घालण्याआधी हे मिश्रण घाम येणाऱ्या भागांवर लावा.

पाणी उकडून घ्या आणि त्यात ग्रीन टी ची काही पाने टाका. हे पाणी थंड झालं तर कॉटनच्या मदतीने ते घाम येणाऱ्या भागात लावा. चहा त्वचा शुष्क आणि गंधमुक्त ठेवण्यास मदत करते. याचा वापर तुम्ही आठवड्यातून दोनदा करा.

एज कप ताजा टोमॅटोचा रस घ्या आणि तो एक बकेट पाण्यात टाका. या पाण्याने आंघोळ करा. टोमॅटोमधील अँटीसेप्टीक गुण कोणत्याही प्रकारचा गंध निर्माण करणाऱ्या बॅक्टेरियाला नष्ट करण्यास मदत करतो.

# नेरळ परिसरात चार कोटींच्या विकासकामांचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन

## भाजप नेते मंगेश म्हसकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य



**नेरळ : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा भाजप सरचिटणीस मंगेश म्हसकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत चार कोटी विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले आहे. पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते तर कर्जत विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार सुरेश लाड आणि भाजप कर्जत विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष किरण ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत या विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

कोकण ग्रामीण पर्यटन विकास माध्यमातून मौजे कोल्हारे येथील उल्हास नदी जवळील पांडवकालीन शिवलिंग परिसरात घाट विकसित करणे आणि नेरळ खांडा येथील टॅक्सी स्टँड जवळ स्लॅप ड्रेन पुल बांधणे आणि परिसरात सुशोभीकरण करण्यात येणारं आहेत.

नेरळ ग्रामपंचायत माजी उपसरपंच तथा भाजप रायगड जिल्हा सरचिटणीस मंगेश म्हसकर यांचा ९ एप्रिल हा वाढदिवस.दरवर्षीप्रमाणे म्हसकर हे आपला वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून उत्साहात साजरा करीत असतात. या वर्षी म्हसकर यांनी आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत नेरळ येथील विकास कामांसाठी किरण ठाकरे यांच्या मदतीने चार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून आणला आहे.

नेरळ शहरातील रेल्वे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी त्यांनी हा प्रयत्न केला.यासाठी नेरळ खांडा परिसरात नेरळ माथेरान सेवा पुरवणाऱ्या वाहन चालकांसाठी वाहन तळ उभारले जाणार आहे.यामुळे येथील शनिवार रविवार वाहतूक कोंडी दूर होवून येथील बेशिस्त वाहन चालक कुठेही रस्त्यात वाहन उभे करणार नाहीत.यामुळे कायमची वाहतूक कोंडी सुटणार असून सर्वसामान्य ग्रामस्थांना दिलासा मिळणार आहे.

आज विकासकामांचे भूमिपूजन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी आमदार सुरेश लाड व किरण ठाकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात पार पडला.यावेळी भाजप पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्याच बरोबर कोल्हारे उल्हास नदीवर अनेक वर्षे येथील दशक्रिया विधी साठी येणाऱ्या ग्रामस्थांना कुठलीच सोय नसल्याने परिसरात सुखसोयी उपलब्ध करून म्हसकर यांनी यासाठी देखील दोन कोटी निधी मंजूर करून आणला.

# खालापुरातील नांवढे गावात वाद; चॉपर, दगडांचा मारा

**खोपोली : प्रतिनिधी**

नावंढे गावात किरकोळ वादातून धारदार शस्त्र आणि दगडाने एकमेकाला मारहाण केल्याची घटना रविवारी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास घडली. दोन्ही गटाने परस्परविरोधी तक्रार खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे. अतुल अशोक हाडप यांनी दिलेल्या तक्रारीनुसार

घराचे समोरील अंगणामध्ये प्रफुल रमेश हाडप ,सिद्धेश रमेश हाडप ,जनार्दन बापू हाडप, मंदार जनार्दन हाडप, अजय सुरेश हाडप आणि अमर विनायक हाडप (सर्व रा. नावंढे ता खालापुर )यानी संगणमत करुन जमाव जमवुन शिवीगाळी दमदाटी केली. सिद्धेशने अतुल यांच्या अंगावर चॉपर मारला तो त्यानी चुकवीला असता तो त्यांचे वडीलांचे डोक्यास लागला .तसेच प्रफुल याने कमरेच्या पटटयाने अतुलला मारहाण केली. इतर साथीदारानी दगडी तसेच चप्पलांनी मारहाण केल्याची तक्रार अतुल हाडप यांनी खालापूर पोलीस ठाण्यात दिली आहे.

सिद्धेश रमेश हाडप यांनी दिलेल्या तक्रारीनुसार ते केळवली रेल्वे स्टेशन जवळून जात असताना अतुल हाडप, प्रवीण पिंगळे, अशोक हाडप यांनी शिवीगाळी केली. त्याबाबत सिद्धेश घरी विचारणा करणेकरीता गेले असता अतुल हाडप याने सिद्धेश यांचा भाउ यांला ए लंगडया तुझे दोन्ही पाय मोडीन असे बोलुन त्याचे हातावर चौकोणी रॉडचा फटका मारला. तसेच चॉपरने हाताच्या मनगटावर व छातीवर वार केला .त्यावेळी भांडण सोडवण्यासाठी मध्ये पडलेल्या सिद्धेश यांच्या आई आणि भावाला अतुल यांच्या इतर साथीदाराने मारहाण केली.

याबाबत खालापूर पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस हवालदार निलेश कांबळे, हे करीत आहेत.

# पाल्हे पुलावरून अवजड वाहतूक सुरूच

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यात नागाव ग्रामपंचायत हद्दीत येत असलेल्या नागाव बायपास रस्त्यातील पाल्हे पुलावरून सार्वजनिक बांधकाम खात्याने अवजड वाहतुकीस बंदी केली असून तसे फलक पुलाचे परिसरात लावले आहेत. तरीही सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सुचनेकडे दुर्लक्ष करून बिनधोकपणे पाल्हे पुलावरून अवजड वाहतुक होत असल्याचे दिसून येते.

नागाव ग्रामपंचायत हद्दीतील पाल्हे पुलाची स्थितीचे सार्वजनिक बांधकाम खात्याने अवलोकन करून पुलावरून अवजड वाहतुक बंदी ठेवली आहे. याबाबतचे फलक पाल्हे पुलाच्या परिसरातील रस्त्याला लावण्यात आले आहेत. तरीही या पुलावरून मालवाहतुक ट्रक अवजड साहित्य भरून ये-जा करत असलेले दिसतात. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सुचनेकडे व पुलाचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अवजड वाहतुक बिनधोकपणे होत असल्याने प्रवासीवर्ग संप्तत प्रतिक्रिया व्यक्त करत आहे. या पुलावरून होत असलेल्या अवजड वाहतुकीने भविष्यात दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

पाल्हे पुल नित्याने वाहतुकीचा मार्ग आहे,या मार्गाने रेवदंडा, मुरूडकडे जाणारी वाहने नित्याने जा-ये करत असतात. सध्यस्थितीत वाहतुकीसाठी महत्वाचा असलेला पाल्हे पुलाची दुरूस्ती अथवा नुतनीकरण संबधीताने लवकरच करावे अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.



# ‘फलोद्यान क्षेत्राची ई-पीक पाहणी करणे अनिवार्य’

**पोलादपूर : प्रतिनिधी**

फळपिक लागवड केलेल्या शेतकर्यांनी आपले पिक लागवड क्षेत्राची मोवाईल ऍप्लिकेशनद्वारे ई-पिक पहाणी करण्याचे आवाहन पोलादपूर तालुका कृषी अधिकारी वैशाली फडतरे यांनी केलें आहे.

पोलादपूर तालुक्यातून पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेमध्ये आंबा पिकासाठी एकूण ७२५ शेतकरी यांनी २५०.१९ हेक्टर क्षेत्रासाठी तर काजू या फळपिकासाठी एकूण १९ शेतकरी यांनी ५.६६ हेक्टर क्षेत्रासाठी आपला सहभाग नोंदवला आहे. १२ जून २०२४च्या शासन निर्णयाद्वारे महाराष्ट्र राज्यात पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजना राबविण्यात येत आहे. रायगड जिल्ह्यामध्ये आंबिया बहार सन २०२४-२५ करीता युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीमार्फत आंबा व काजू या फळपिकांसाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेच्या निकषानुसार या विमा योजनेत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना ई-पिक पाहणी करणे बंधनकारक आहे. ज्या शेतकऱ्यांनी आंबिया बहार सन २०२४-२५ मध्ये फळपिक विमा योजनेत सहभाग घेतलेला आहे, परंतू फळबागांची ई-पिक पाहणी डिजीटल क्रॉप सर्व्हे मोबाईल ऍपद्वारे केलेली नाही. त्यांनी २५ एप्रिलपर्यंत विमा संरक्षित क्षेत्राची ई-पिक पाहणी पूर्ण करुन घेणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा योजनेच्या निकषांनुसार ई-पिक पाहणी नोंद नसलेले सर्व विमा अर्ज रदद करण्यात येतील व फळपिक विम्याचा लाभ दिला जाणार नाही. असा संदेश राज्य शासनाकडून प्राप्त झाला आहे.

आपले मोबाईल मधून डिजीटल क्रॉप सर्व्हे मोबाईल एँपद्वारे आपल्या फळबागेची ई-पिक पहाणी पूर्ण करावी म्हणेज पुनर्रचित हवामान आधारीत फळपिक विमा योजनेतील आपला सहभाग कायम राहिल व संभाग्य नैसर्गिक हवामानाच्या धोक्यापासून आपल्या फळबागेचे विमा कवच अबाधित राहिल.

## कंटेनर व कारचा अपघात; एक जखमी

**खोपोली :** जुना पुणे मुंबई हायवेवर एक्सप्रेस हायवेच्या ब्रिजखाली मिळठाकुर वाडी गावचे हददीत कार आणि ट्रकच्या अपघातात कार मधील प्रवासी महिला जखमी झाली खोपोली पोलीस ठाणे हद्दीत (दि.८)रोजी मौजे मिळठाकुरवाडी येथे मुंबई कडे जाणार्या कंटेनरने समोर चाललेल्या टुरीस्ट डिझायर कारला ठोकर मारल्याने अपघात झाला या मध्ये महिला प्रवासी जखमी झाली

# खर्डी बुद्रुक शाळेतील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेत यश

**माणगाव: प्रतिनिधी**



तालुक्यातील राजिप शाळा खर्डी बुद्रुकच्या विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केल्याने शाळेतील शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

सन २०२४-२५ शैक्षणिक वर्षांमध्ये घेण्यात आलेल्या मंथन प्रज्ञाशोध व बीटीएस भारत टॅलेंट स्पर्धा परीक्षेमध्ये राजिप शाळा खर्डी बुद्रुक येथील कु.अथर्व कमलेश शेडगे (इ.दुसरी),अर्णव रुपेश तळवटकर (इ.दुसरी) मुद्रा नरेश शेडगे ,तेज नंदू ढाकवळ राज्यस्तरीय बीटीएस परीक्षा व पूर्वा विनोद शेलार,सांची रोहिदास जाधव (इ.तिसरी) ,(इ. चौथी)अवनी राजू तळवटकर,आरोही रुपेश तळवटकर यांनी राज्यस्तरीय मंथन प्रज्ञाशोध परीक्षा मध्ये उत्तम यश प्राप्त केल्याने पालक ,ग्रामस्थ ,शाळा व्यवस्थापन कमिटी व शिक्षकांच्या वतीने सर्वांचे अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांना गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट,केंद्रप्रमुख शंकर शिंदे ,मुख्याध्यापिका केशर सानप,उपशिक्षिका रितिका गोसावी यांचं बहुमोल असे मार्गदर्शन लाभले.

# वरदाइ ट्रस्टतर्फे ३०० सायकलींचे वाटप

**मुरुड : प्रतिनिधी**

वरदाइ चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या विद्यमाने व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे ,माजी आमदार अनिकेत तटकरे व खासदार सुनील तटकरे यांच्या सहकार्याने श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर व अंजुमन इस्लाम ऊसरोली हायस्कूल येथील शालेय विद्यार्थिनी ज्या इयत्ता सातवी ते दहावी मध्ये शिकत असणाऱ्या शालेय विद्यार्थिनींना सुमारे तीनशे सायकल आज वाटप करण्यात आले.

सदरील सायकल वाटप प्रसंगी मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी चे अध्यक्ष फैरोज घलटे ,अलिबाग मुरुड विधानसभा क्षेत्र अध्यक्ष अमित नाईक,माजी जिल्हा परिषद सदस्य सुबोध महाडिक,रायगड जिल्हा सोशल मिडिया सेल चे उपाध्यक्ष हसमुख जैन,राष्ट्रवादी काँग्रेस चे नेते मनोज भगत,माजी सरपंच अजित कासार,माजी सरपंच मनीष नांदगावकर,सचिव विजय पैर,मुरुड तालुका महिला अध्यक्ष ॲड.मृणाल खोत, संचालकॲड.इस्माईल घोले,अस्लम हलडे,माजी नगरसेविका प्रिता चौलकर,नांदगाव सरपंच अल्पा घुमकर,मुश्ताक झोबडकर आदी मान्यवर मोठ्या संखेने उपस्थित होते.

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय येथील भव्य पटांगणावर सदरील सायकल वाटपाचा कार्यक्रम सपन्न झाला.या वेळी आपल्या मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे यांनी सांगितले की,या हायस्कूल मधील शालेय विद्यार्थ्यांसाठी तीन वर्ग खोल्या बांधण्यासाठी सुरुवातीला २५ लाख व आता १० लाख रुपयांचा निधी लोकप्रिय खासदार सुनील तटकरे यांनी दिला आहे.आतासुद्धा सायकल वाटप प्रसंगी खासदार तटकरे यांचे मोठे योगदान असून त्यांचे या वेळी त्यांनी विशेष आभार व्यक्त केले.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख नेते मनोज भगत यांनी सांगितले की,गरजू विद्यार्थ्यांना सायकल मिळाल्याने वेळेची बचत होऊन सर्व मुले शाळेत वेळेत पोहचणार आहेत. समाजातील तळा गाळातील घटकापर्यंत सायकल पोहचवण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे.



# अनुदान व बीज भांडवल योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाकडून राज्य शासनाच्या अनुदान व बीज भांडवल योजना राबविण्यात येत असून या योजनांचा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक एस.आर. म्हसकर यांनी केले आहे.

महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या राज्य शासनाच्या योजना पुढीलप्रमाणे आहेत. ५० टक्के अनुदान योजना-प्रकल्प मर्यादा- रु.५०,०००/- पर्यंत प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किंवा जास्तीतजास्त २५,०००/- पर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरित बँकेमार्फत देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे ३ वर्षात करावयाची आहे.

बीजभांडवल योजना- प्रकल्प मर्यादा- रु.५०,००१ ते ५ लाख पर्यंत प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीज भांडवल कर्ज महामंडळामार्फत ४ टक्के द.सा.द.शे. व्याज दराने देण्यात येते. या राशीमध्ये महामंडळाचे अनुदानाचा रु. ५०,०००/- समावेश आहे. बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियमाप्रमाणे व्याजदर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार ३ ते ५ वर्षाचे आत करावी लागते. अर्जदारास ५ टक्के स्वत:चा सहभाग भरावयाचा आहे.

अर्ज करण्यास आवश्यक पात्रता- अर्जदार अनुसूचित जाती/ नवबौध्द संवर्गातील असावा व त्याचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे. राज्य महामंडळाच्या योजनेकरीता वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरी व ग्रामीण भागाकरीता रुपये ३ लाख असावी. अर्जदार हा महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा (राज्य/केंद्र) थकबाकीदार नसावा.

अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे- जातीचा व उत्पन्नाचा सक्षम अधिकऱ्यानी दिलेला दाखला. पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, आधारकार्ड व पॅनकार्ड, व्यवसायाचे कोटेशन, व्यवसायासाठी आवश्यक असल्यास जागेचा पुरावा, व्यवसायानुरुप इतर आवश्यक दाखले आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल, व्यवसायानुरुप आवश्यकते प्रमाणे इतर दाखले पत्र.उदा. वाहनाकरीता व व्यवसायाकरीता लायसन्स, परमिट, बॅजनंबर इ.जनधन योजनेचे खाते क्रमांक व पासबुकची झेरॉक्स

प्रशिक्षण योजना- अनुसूचित जातीच्या लाभधारकांना व्यवसायासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य प्राप्त करण्यासाठी व संबंधित तांत्रिक व्यवसाय सुरु करण्याकरीता विविध व्यवसायिक ट्रेडचे शासनमान्य संस्थांमार्फत (३ ते ६महिन्यांपर्यंत) मोफत प्रशिक्षण देण्यात येते. प्रशिक्षण फी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांना महामंडळामार्फत देण्यात येते.

## आपले सरकार पोर्टल पाच दिवस राहणार बंद

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाकडून १० एप्रिल २०२५ (गुरुवार) ते १४ एप्रिल २०२५ (सोमवार) दरम्यान ‘आपले सरकार’ पोर्टलवर नियोजित देखभाल आणि हार्डवेअर अद्ययावत करण्याचे काम करण्यात येणार आहे.या कालावधीत ‘आपले सरकार सेवा पोर्टल’ वरील सर्व सेवा आणि प्रणाली काही काळासाठी अनुपलब्ध राहतील. १० ते १४ एप्रिल या कालावधीत बहुतांश दिवस सार्वजनिक सुट्ट्या आहेत.

वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

महावितरण

**निविदा सुचना**

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या संचालन व सुव्यवस्था विभाग, अलिबाग कार्यालयाअंतर्गत विभागीय, उपविभागीय कार्यालये, स्टोअर साठी गाड्या भाडेतत्वावर घेणेसाठी ३ वर्षांच्या करारासाठी (अंदाज पत्रकीय रक्कम प्रत्येकी ११.४८४ लाख) आणि विविध अवजड कामांकरिता हायड्रा क्रेन सेवा भाडेतत्वावर घेणेसाठी १ वर्षांच्या करारासाठी (अंदाज पत्रकीय रक्कम ०५.०० लाख) नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यासाठी ई-निविदा क्रमांक टी-०५, टी-०६, टी-०७, टी-०८, टी-०९, टी-१०, टी-११, टी-१२/०४-२०२५ एकूण ८ निविदा महावितरण कंपनीच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आल्या आहेत. सदर निविदा विक्रीसाठी दि.०९.०४.२०२५ ते २१.०४.२०२५ (रात्री ११.५० वा.) पर्यंत उपलब्ध राहतील. निविदा भरण्याची अंतिम तारिख दि. २१.०४.२०२५ ला रात्री ११.५९ वाजेपर्यंत आहे. निविदेच्या आवृत्तीत / शुद्धीपत्रातील कोणताही बदल यापुढे आमच्या संकेत स्थळावर प्रकाशित केला जाईल.

PRO NO-182 — कार्यकारी अभियंता, अलिबाग विभाग

**पनवेल महानगरपालिका**
तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड
**वाहन विभाग जाहीर सूचना**

पनवेल महानगरपालिकेची १५ वर्षापेक्षा जास्त वय असणारी बंद अवस्थेतील निष्कासित (Scrap) करावयाची ११ वाहने केंद्र शासनाच्या निर्देशानुसार MSTC मार्फत ई-लिलाव पध्दतीने विक्री करण्यात येत आहेत. सदरच्या ई-लिलावाचा तपशील.

| | |
|---|---|
| ई-लिलाव क्र. - | MSTC/WRO / Panvel Municipal Corporation / 1/ Panvel / 25-26/1638 (498472) |
| लिलाव सुरू होण्याची दिनांक व वेळ | दिनांक ११/०४/२०२५ वेळ - दू.१२.०० वा. |
| लिलाव संपण्याची दिनांक व वेळ | दिनांक ११/०४/२०२५ वेळ - सायं. ४.०० वा |
| वाहने तपासणी करणंची दिनांक | दिनांक २९/०३/२०२५ पासून दिनांक १०/०४/२०२५ पर्यंत |

सदरच्या ई-लिलावा संदर्भात MSTC च्या https://www.mstcecommerce.com या संकेतस्थळावर सर्व माहिती उपलब्ध आहे.
दिनांक : ९/०४/२०२५
जा.क्र.पमपा/जनसंपर्क/३१२४/
प्र.क्र.१५३/१५३/२०२५

सही/-
उप आयुक्त (वाहन)
पनवेल महानगरपालिका

# पदपथावर अनधिकृत व्यापार

## तुर्भे येथे एपीएमसी मार्केटलगत प्रकार

**नवी मुंबई : प्रतिनिधी**



तुर्भे येथे एपीएमसी मार्केट लगतच्या पालिकेच्या पदपथावर एपीएमसीतील खोका व्यापाऱ्यांनी अनधिकृत व्यापार चालू केला आहे. विशेष म्हणजे कोणतीही सुरक्षेची उपाययोजना या ठिकाणी करण्यात आली नाही. त्यामुळे आगीची दुर्घटना घडून गेल्यावर महापालिका प्रशासनाला जाग येणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. या खोका व्यवसायिकांवर कारवाई करण्यात, यावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

तुर्भे येथील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळ मार्केटमध्ये मागील महिन्यापासून आंबा हंगाम जोर धरू लागला आहे. राज्यातून आणि परराज्यातून एक लाख हून अधिक आंब्याच्या पेट्यांची आवक दररोज मार्केटमध्ये होत आहे. यातील बऱ्याच पेट्या खाली करून त्या कागदी पेट्या किंवा प्लास्टिक क्रेटमध्ये विक्री केली जाते. त्यामुळे या लाकडी पेट्या पुन्हा बागायतदारांकडे पाठवल्या जातात. त्यासाठी एपीएमसीकडून लाकडी पेट्या खरेदी - विक्री करणाऱ्यांना परवाने देण्यात आले आहेत. त्यानुसार हे व्यापारी आंबा व्यापाऱ्यांकडून लाकडी पेट्यांची खरेदी करून ती पुन्हा बागायतदारांना विक्री करतात. यामध्ये लाखो रुपयांची उलाढाल आहे. पूर्वी अशा प्रकारे लाकडी पेट्यांची खरेदी विक्रीचा व्यवसाय फळ मार्केट मधील एन विंग आणि त्या लगतच्या मोकळ्या मध्ये केला जात होता; परंतु मागील वर्षी या ठिकाणी लागलेल्या आगीमुळे खोका व्यावसायिकांना एपीएमसी आवारात पेट्यांची खरेदी विक्री करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

तेव्हापासून या २० हून अधिक खोका व्यवसायिकांनी तुर्भे येथील एपीएमसी फळ मार्केट ते भाजी मार्केट पर्यंतच्या पदपथावर आंब्याच्या पॅकिंगसाठी लागणाऱ्या लाकडी पेट्यांची विक्री करणाऱ्याचा व्यवसाय चालू केला होता. मागील वर्षी या प्रकरणी महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी विभागाने कारवाई केली होती; मात्र यावर्षी हा व्यवसाय चालू होऊन महिना उलटला तरी अतिक्रमण विरोधी विभागाने याकडे डोळेझाक केल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी आगीपासून सुरक्षा विषयी कोणतीही उपायोजना न करता आग प्रतिबंधात्मक नियमांचे उल्लंघन करत राजरोस पणे व्यवसाय चालू आहे. यामुळे दुर्दैवाने आगीची घटना घडल्यास मोठा अनर्थ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी संबंधित बेकायदेशीर व्यवसायावर कारवाई करण्यात, यावी, अशी मागणी स्थानिक नागरिक करीत आहेत.

# नवकार महामंत्र दिवस उत्साहात साजरा; मान्यवरांची उपस्थिती





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशभरात प्रथमच नवकार महामंत्र दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. नवी दिल्ली येथे आयोजित या ऐतिहासिक कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थित राहून विशेष संबोधन दिले. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण पनवेलमधील श्री मेवाड स्थानकवासी जैन सेवा संस्थेच्या साधना भवन येथे या प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या दिवशी नवकार महामंत्राचे सामूहिक पठण करण्यात आले आणि जैन धर्माच्या तत्त्वज्ञानावर आधारित प्रेरणादायी विचार मांडण्यात आले. नवकार महामंत्र हे जैन धर्मातील अत्यंत पवित्र आणि सर्वश्रेष्ठ मंत्र मानले जाते. या मंत्राचा जप केल्याने मानसिक शांती, सद्गुणांची प्राप्ती आणि आत्मोन्नती होते, असे मानले जाते. पनवेलमधील या कार्यक्रमात जैन समाजातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे थेट प्रक्षेपण अनुभवले आणि त्यांच्या संदेशातून प्रेरणा घेतली.

या वेळी संजय जैन, रौनक सुराना, जयंती परमार, श्रद्धा मुनोथ, चीराग पालरेचा, हर्षीत बाफणा, तनीशा बाफणा, ममता जैन आणि शर्मीला बाफणा हे विशेष उपस्थित होते.

# कालिवलीत श्री प्रभू रामचंद्र प्राणप्रतिष्ठा सोहळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा अतिरीक्त एम आयडीसी श्री प्रभू रामचंद्र/सिता, हनुमंत राया, व गणपती मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा हनुमान मंदिर कालीवली येथे हरि नामाचा गजर करत मोठ्या भक्ती भावाने करण्यात आला.

या वेळी कळस पुजन, ध्वजपुजन विना पुजन मृदंगपुजन पुजन ग्रामस्थ मंडळ कालिकती यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रवचन हभप. काशिवाय महाराज जांभिवली ह.भ.प. विकुन महाराज पाटील (चावने) ह.भ.प. कृष्णा महाराज पाटीत (कासप) परमात्म्याचे हरि भजन गावदेवी महिला हरिपाठ मंडळ (कासप) नावदेवी महिला हरिपाठ मंडळ (सावळे) मरीआई महिला हरिपाठ मंडळ (नारपोली) हरि कीर्तन ह.भ.प. रामबंद महाराज पाटील, ह.भ.प. काशिनाथ महाराज रावकर, ह.भ.प. अनंता महाराज मोरे तर रामजन्माचे हरि किर्तन : ह.भ.प. महादेव महाराज मांडे (रिसवाडी) यांच्या हरि किर्तनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामस्थ मंडळ कालिवली अथक परिश्रम घेतले.

## नांदा सौख्यभरे!



**उरण : भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री सुरेश पाटील यांची कन्या समीक्षा हिचा विवाह रिषभ याच्याबरोबर नुकताच जासई येथे झाला. या उभयतांना आशीर्वाद देण्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह भारतीय मजदूर महासंघाचे पदाधिकारी, सदस्य, सर्वपक्षीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# तळोजा-खारघर उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा फेज २ आणि खारघर यांना जोडणारा नवीन पूल उभारण्यात आला आहे. हा उड्डाण पूल येथील रहिवाशांच्या दैनंदिन जीवनातील अडचणी सोडवण्यास महत्त्वाची भूमिका बजावेल आणि वाहतुकीची सुविधा अधिक सुलभ होईल.

सिडको महामंडळाने तळोजा फेज २ व खारघर यांना जोडण्यासाठी उभारलेल्या पुलामुळे स्थानिक नागरिकांना मोठा दिलासा मिळेल. या अनुषंगाने तळोजा-खारघर उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी तळोजातील नागरिकांकडून करण्यात आली आहे. याबाबत त्यांनी संबंधित प्रशासनाला निवेदन दिले आहे.

या निवेदनात त्यांनी तळोजा उड्डाणपुलाची नव्याने उभारणी झाली असून हा उड्डाणपूल सार्वजनिक वापरासाठी त्वरित सुरू करणे अत्यंत गरजेचे आहे.

दैनंदिन वाहनांची संख्या वाढल्यामुळे स्थानिक वाहतूक व्यवस्थेत अडचणी निर्माण झाल्या आहेत. तसेच नवीन बांधलेल्या उड्डाणपुलाची या भागातील वाहतूक सुरळीत करण्यास मोठी मदत होणार आहे. त्यामुळे तळोजा-खारघर उड्डाणपूल सार्वजनिक वापरासाठी सुरू करून प्रवासी व रहिवाशांना जलद, सुरक्षित आणि सुकर मार्ग प्राप्त करून द्यावा, असे मत त्यांनी या निवेदनात नमूद केले. त्याच प्रमाणे या पुलावरील वाहतूक सुरू झाल्यावर प्रवाशांचा वेळ वाचून त्यांचा प्रवास जलदगतीने होणार आहे. पुल वाहतुकीसाठी लवकर खुला करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.





**पनवेल : मोराज टी १,टी २,टी ३ टी ४ टाईप सीएचएस लिमिटेड या सोसायटीमध्ये श्री सत्यनारायण पूजा झाली. सोसायटीमधील सर्व नागरिकांनी एकजुटीने विविध कार्यकामांचे आयोजन केले होते. महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला. विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम झाले. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा यांची विशेष उपस्थिती लाभली.**

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून मुख्याध्यापिका साधना पाटील यांचे अभिनंदन

## 'रयत'च्या पिरकोन येथील शाळेला मदत जाहीर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पिरकोन येथील रयत शिक्षण संस्थेच्या 'कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात फुंडे येथील विद्यालयात कार्यरत असलेल्या साधना पाटील यांची मुख्याध्यापक म्हणून पदोन्नती मिळाली आहे. त्यानिमित्त त्यांनी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेऊन आशीर्वाद घेतले.



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुष्पगुच्छ देऊन साधना पाटील यांचे अभिनंदन केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयातील स्टाफ रूम, मुख्याध्यापक कार्यालय आणि दोन वर्ग खोल्यांमध्ये इंटेरियर काम तसेच पाच डिजिटल बोर्ड घेण्यासाठी २५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली.

या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आणि विद्यालयाचे चेअरमन जीवन गावंड, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभाग पीआरओ बाळासाहेब कारंडे, पिरकोन गावचे पोलीस पाटील संतोष मोकल, शिक्षक पुरण पाटील, संजय म्हात्रे, बी. बी. डाढाळे, पी. पी. पाटील यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# लिमये वाचनालयाच्या विशेष सभेत विविध विषयांवर चर्चा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील के.गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयाची विशेष सर्वसाधारण सभा शनिवारी (दि.५) संस्थेच्या अध्यक्ष ॲड. सुनिता श्रीकांत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

संस्थेच्या इमारतीस ७५ वर्ष पूर्ण होऊन ती जीर्ण झाली असल्याने नवीन इमारत बांधणे गरजेचे आहे, असे मत अध्यक्षांनी प्रस्तावनेत मांडले. कार्यवाह जयश्री शेट्ये यांनी सभासदांचे स्वागत केले. सर्वप्रथम पुनर्बांधणी प्रस्ताव कार्यकारिणीचे कोषाध्यक्ष प्रकाश पाटील यांनी सभेपुढे मांडला. त्यानंतर संस्थेच्या इमारतीत समाविष्ट असलेल्या गाळेधारकांबद्दलची माहिती ॲड. माधुरी थळकर यांनी सभेला दिली. इमारतीच्या बांधकामासंदर्भात होणारा अपेक्षित खर्च व त्याकरिता जमा कराव्या लागणाऱ्या अपेक्षित निधीची माहिती संस्थेचे सदस्य काशिनाथ जाधव यांनी सांगितली. बिल्डींग पाडल्यानंतर संस्थेच्या स्थलांतरणाबाबतची माहिती उपाध्यक्ष बळीराम परशुराम म्हात्रे यांनी सभेस दिली.

सर्व प्रक्रियेस संस्थेच्या कार्यकारिणी सदस्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल रायगड जिल्हा ग्रंथालय संघ अलिबागचे अध्यक्ष संजय बोंदार्डे यांनी कौतुक केले. जुनी इमारत पाडून नवीन इमारत बांधण्यासाठीचे सर्व अधिकार कार्यकारिणीला देण्यात यावे तसेच आवश्यकतेनुसार संस्थेच्या एफडीचा वापर करण्यात यावा, असे तीन ठराव या वेळी पारित करण्यात आले.

या ठरावास अनुक्रमे शशिकांत बांदोडकर, अनंत सिंगासने, दत्तात्रय जाधव, माधुरी गोसावी, शिवदास पालकर, मोहन मुजुमदार आदी उपस्थित सभासदांनी हात वर करून एकमताने आपली संमती दर्शविली तसेच उपस्थितांनी इमारत निधीसाठी मदत करण्याचेही आश्वासन दिले. सदस्य सुनील खेडेकर यांनी आभार मानले.

# कोंडले येथे राम नवमी उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल चैत्र शुद्ध रामनवमीला ६ आणि ७ श्रीराम मंदिरात राम नवमी उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला.

सकाळी श्रीराम जन्मोत्सव किर्तनकार प्रवीण शिंदे महाराज यांचे किर्तन सांगितले. प्रसाद म्हणून सुंठवडा वाटण्यात आले असंख्य भाविकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. श्रीराम नवमी संध्याकाळी ५ वाजता पालखी काढण्यात आली. या कालावधीत नित्य पूजा आरती भजन कीर्तन प्रवचन झाले रामनवमीच्या निमित्ताने सकाळपासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यांच्या लाभ शेकडो नागरिकांनी घेतला या वेळी अन्य कोंडले गावातील रामभक्त महिला वर्ग ग्रामस्थ आदी उपस्थित होते, अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते रविंद्र पाटील यांनी दिली.

# मुदतपूर्व जन्मलेल्या व मधुमेहाने ग्रासलेल्या बाळावर योग्य उपचार

**पनवेल : वार्ताहर**



खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमधील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टिमने नवजात शिशु तज्ज्ञ आणि एनआयसीयू विभागाचे डॉ. तन्मेष कुमार साहू आणि सल्लागार बालरोग एंडोक्राइनोलॉजिस्ट डॉ. रचना केशवानी यांच्या नेतृत्वाखाली अवघ्या ३० आठवड्यांनी जन्मलेल्या व नवजात मधुमेहाने ग्रासलेल्या बाळावर योग्य उपचार करण्यात आले.

नवी मुंबई येथील जोडपे, त्यांच्या पहिल्या बाळाच्या आगमनाची उत्सुकतेने वाट पाहत होते. गर्भावस्थेतील मधुमेह असलेल्या गर्भवती मातेला गर्भावस्थेच्या अवघ्या ३० आठवड्यांतच सॅकमधून अम्नीओटिक द्रवपदार्थ बाहेर आल्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत सी-सेक्शन करावे लागले. यानंतर तिने १.१ किलो वजनाच्या बाळाला जन्म दिला व या बाळाला श्वसनाचा त्रास होत होता. जन्माला आल्यानंतर त्या बाळाला तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली तत्काळ नवजात शिशु अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) दाखल करण्यात आले.

नवजात बाळामधील मधुमेह हा एक अत्यंत दुर्मीळ आजार आहे आणि अकाली बाळामध्ये त्याचे निदान करण्यासाठी अचूकता आणि कौशल्य गरजेचे आहे आहे. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील आमच्या टीमने या दुर्मिळ आजाराचे नियंत्रण करत प्रभावीपणे उपचार आले. बाळाच्या पालकांनाही याबाबत योग्य प्रशिक्षण दिले, अशी माहिती बालरोग एंडोक्राइनोलॉजिस्ट डॉ. रचना केशवानी यांनी स्पष्ट केले.

# विचुंबे येथे आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय जनस्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्था, विचुंबे ग्रामपंचायत, आजीवली प्राथमिक आरोग्य केंद्र आणि श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटल यांच्या वतीने ७ एप्रिल २०२५ रोजी जागतिक आरोग्य दिनानिमित्त ०-५ वर्ष वयोगटातील बालकं आणि गर्भावती महिलांसाठी विशेष आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.



या शिबिराचे उद्घाटन विचुंबे ग्रामपंचायत सरपंच प्रमोद भिंगारकर, एनआयपीएचटीआरचे संचालक डॉ. धवल थोरात, बळीराम पाटील, महिला बाल कल्याण समिती सभापती श्रावणी भोईर, डॉ.मंगेश पाटील सहसंचालक, डॉ. शुभांगी बाविस्कर, डेप्युटी कमिशनर, डॉ. अपर्णा पवार तालुका मेडिकल ऑफिसर, डॉ ऋषीकेश वडके, सल्लागार आणि सार्वजनिक आरोग्य विभाग प्रमुख सत्य साई संजीवनी हॉस्पिटल खारघर, डॉ सायली मानकर आदी उपस्थित होते.

सकाळी १० ते २ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात, सत्य साई संजीवनी हॉस्पिटलच्या स्त्री रोग तज्ञ डॉ सारिका म्हात्रे आणि एनआयपीएचटीआरच्या बालरोग तज्ञ डॉ सुचित्रा सुर्वे यांनी आरोग्य सेवा दिली. या शिबिरात मुलांच्या हृदयाची तपासणीदेखील करण्यात आली. श्री सत्य साई संजीवनी हॉस्पिटलच्या वतीने गर्भवती महिलांची विशेष तपासणी करून त्याना पोषक आहार विषयक मार्गदर्शन करण्यात आले. विचुंबे येथील जिल्हा परिषद शाळेत झालेल्या या शिबिरात सुमारे ४० गर्भवती महिला आणि १२० बाळांची तपासणी करून उपचार आणि सल्ला देण्यात आला.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी, विचुंबे ग्रामपंचायतिच्या सदस्या आणि महिला बाल कल्याण सभापती सौ श्रावणी भोईर यांच्या नेतृत्वात ग्रामपंचातीच्या सर्व कर्मचारी, राष्ट्रीय जनस्वास्थ्य प्रशिक्षण आणि संशोधन संस्थान च्या विविध प्रशिक्षणात सहभागी झालेले विद्यार्थी, नर्सिंग ऑफिसर, समाज कार्यकर्ते, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, संख्यकीय सहाय्यक, आर्टिस्ट यांच्या सह आजीवली पीएचसीचे आरोग्य सहायक, एएनएम, आशा कार्यकर्त्या, या सर्वांनी विशेष परिश्रम घेतले.

# साळाव-मुरुड रस्त्याचे काम वेगात

## दोन्ही बाजूने होणार रुंदीकरण

**मुरुड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते नुकतेच साळाव मुरूड या २९ किलोमीटर रस्त्याचे भूमिपूजन मोठ्या दिमाखात करण्यात आले होते.

रेवदंडा पुल ते कोर्लई, बोर्ली मुरूड एम. एस. एच. ४ किमी २८०/७४५ ते ३१०/१४५ साठी कॉंक्रीट पेव्हमेंट रस्त्याचे बांधकाम आणि पुल व कलवर्ट चे पुर्णबांधणी व रूंदी करण एकुण लांबी २९.४० किमी या रस्त्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून १३९ कोटी ४८ लाख रुपये खर्च करण्यात येऊन या रस्त्याचे रुंदीकरण व कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे.



रस्त्याचे भूमिपूजन होताच तातडीने रस्ता लवकरात लवकर निर्माण होण्यासाठी युद्धपातळीवर कार्यवाही होण्यास सुरुवात झाली आहे. सध्या या रस्त्याचा मध्य काढण्याचे काम सुरू आहे. साळाव ते मुरूड या रस्त्याचे मध्यभागातून ८ मीटर उजवीकडे व ८ मीटर डावीकडे एवढी रुंदी वाढणार आहे. त्यामुळे मुंबईला जोडणारा हा प्रमुख रस्ता रुंदीने मोठा होणार असून तीन मोठ्या गाड्या आरामात पास होण्यास सुलभ जाणार आहे. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळास हा रस्ता देण्यात आला असून सार्वजनिक बांधकाम खात्याने आपला ताबा सोडला आहे. कारण हा रस्ता आता रस्ते विकास मंडळ यांना वर्ग करण्यात आला आहे. रस्त्यात असणाऱ्या मोऱ्या त्याच प्रमाणे रुंदी वाढत असल्याने डाव्या व उजव्या बाजूची झाडे व झुडपे सुधा तोडण्यात येणार आहेत.

रस्त्याला दोन्ही बाजूस आठ मीटर रुंदी असल्याने रस्त्याच्या अगदी बाजूला असणाऱ्या संरक्षक भिंत व कंपाऊंड वॉल सुधा रस्त्याच्या रुंदीकरणासाठी तोडल्या जाणार आहेत. या बाबत योग्य ती कार्यवाही सुरू असून प्रत्यक्षात रस्ता रुंदीकरण होताना कार्यवाही होताना दिसणार आहे.

सध्या तरी रस्ता रुंदीकरण करताना मध्यबिंदू काढून रस्ता रुंदीकरण प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. रस्ता रुंदीकरणाचा पहिला टप्पा हा साळाव ते बोरली असा सुरू करण्यात येणार आहे. सध्या रस्त्याचे मॅपिंग, मध्यबिंदू व अन्य तत्सम कामे वेगात पूर्ण करण्यात आली आहेत. लवकरात लवकर हा रस्ता पूर्ण झाल्यास लोकांना जलद गतीने मुंबई येथे पोहचण्यास सुलभ जाणार आहे.

# माणगावात चोरीचा प्रयत्न फसला

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील निजामपूर जवळील शिरसाड बौद्धवाडी येथील एका घरात दिवसाढवळ्या चोरी करण्यासाठी गेलेल्या चार अनोळखी मास्क लावलेल्या चोरांनी त्या घरात प्रवेश केला. त्यावेळी त्या घरातील सासू-सून यांनी या अनोळखी इसमाकडे पाहताच चोर-चोर असे आरडाओरड करताच हे चार अनोळखी इसमांनी तेथून पळ काढून पसार होण्यात यश मिळविले.

या घटनेची तक्रार माणगाव पोलीस ठाण्यात संबंधित कुटुंबांनी दिली असून माणगाव पोलीस ठाण्यात अनोळखी चार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून माणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास चालू आहे. या घटनेमुळे निजामपूर भागात भीतीचे वातावरण पसरले असून एकच खळबळ उडाली होती.

या घटनेची थोडक्यात हकीकत अशी की, शिरसाड बौद्धवाडी येथील रीना सनी शिर्के वय २६ वर्ष हि विवाहित महिला आपले पती, दीर, जावूबाई, सासू, सासरे असे घरात राहतात. दुपारची वेळ असल्याने सासरे - भिकू शिर्के, सासू - नंदा शिर्के हे दोघे हॉलमध्ये झोपले होते. रीना शिर्के यांचे पती सनी भिकू शिर्के हे कामासाठी सकाळी ८.३० वाजता कामासाठी बाहेर गेले होते. तर मोठे दीर स्वप्नील भिकू शिर्के हे कामासाठी बाहेर गेले होते. त्यामुळे घरात हि विवाहिता, सासू, सासरे, दोन मुली, असे होते. ५ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजण्याच्या सुमारास चार अनोळखी व्यक्ती तोंडाला मास्क लावलेले घराचा दरवाजा उघडून आत प्रवेश केला त्यावेळी रीना शिर्के यांना घरात कोणीतरी अनोळखी चोर शिरले असल्याचे लक्षात येताच त्यांनी चोर चोर म्हणून मोठ्याने ओरडून आजूबाजूच्या लोकांना व सासू सासऱ्यांना सावध केले.


यावेळी हे चारही अनोळखी इसम पळून गेले. त्यावेळी सासरे भिकू शिर्के यांनी बाहेर येऊन आजूबाजूच्या शेजाऱ्यांना आवाज देवून झालेला प्रकार सांगितला. या घटनेमुळे सदर कुटुंबात घबराट निर्माण झाली असून माणगाव पोलीस ठाण्यात या घटनेची तक्रार दिली असून माणगाव पोलीस या चोरट्यांचा तपास घेत आहेत.

# रायगडात नव्या बुद्ध लेणीचा शोध

## बीड खुर्द गावाच्या डोंगररांगेत बौद्ध संस्कृतीचे नवे दालन

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील बीड खुर्द गावाच्या डोंगररांगेत बौद्ध संस्कृतीचे नवे दालन मिळाले आहे. MBCPR संस्थेने शोधलंय प्राचीन बुद्ध लेणं, ज्यामुळे इतिहासप्रेमींमध्ये आणि बौद्ध अनुयायांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.



या लेणीमध्ये एक भिक्खू निवास आहे. समोरील दर्शनी भाग, आतला आसन भाग याची मोजणी करण्यात आली असून विशेष म्हणजे येथे दोन शिलालेख सापडले आहेत. एका शिलालेखात 'मल(सरी) गिरनं कोझकाने पुसादो' आणि दुसऱ्यामध्ये 'सिंहपभरो(क)' अशी अक्षरे स्पष्ट दिसत आहेत.

गावकऱ्यांना ही लेणी पूर्वीपासून माहिती होती, मात्र पांडवकालीन समजुतीमुळे याकडे दुर्लक्ष झालं. गणेश केदारी आणि राकेश गायकवाड यांच्या पुढाकारामुळे MBCPR (Movement of Buddhist Caves Preservation and Restoration) संस्थेने ३ नोव्हेंबर २०२४ रोजी या ठिकाणी पाहणी केली.

६ एप्रिल २०२५ रोजी सम्राट अशोक जयंतीनिमित्त येथे श्रमदान मोहीम राबवण्यात आली. झाडझुडपे काढणे, दगड हटवणे, समोरील जागा समतल करणे, ही कामे महाराष्ट्रातील विविध भागांमधून आलेल्या ४५ लेणीसंवर्धकांनी पार पाडली.

# मुरुड नगरपालिका शाळांची रंगोत्सव कार्यशाळा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुलांना अभ्यासात गोडी निर्माण व्हावी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, तसेच कौशल्य आणि सृजनशीलतेचा विकास व्हावा, या उद्देशाने मुरुड नगरपरिषद शाळा आणि 'सेवांगण फाउंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमाने 'रंगोत्सव' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



वसंत ऋतू निसर्ग रंगपंचमी साजरी करत असताना, याच रंगोत्सवाशी एकरूप होत, शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील रंगांचा सुंदर उत्सव अनुभवला. 'सेवांगण फाउंडेशन' ही संस्था अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील वाडीवस्तीवर, विशेषतः आदिवासी बहुल भागात काम करत आहे.

विद्यार्थ्यांना शाळा आणि शिक्षणाची गोडी लावणे, विविध उपक्रमातून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, मनोरंजक उपक्रम, त्यातून दैनंदिन जीवनातील कलाकुसर शिकवणे, व्यवहार चातुर्य अंगी बाणणे, यातून शाळा गळती थांबवून ,शिक्षणाचे महत्त्व विशद करणे, अशा अनेक निरपेक्ष हेतूने फाउंडेशनची उभारणी झाल्याचे संस्थापक अध्यक्ष मनिषा नाईक यांनी सांगितले.

मुरूड नगरपालिका शाळा आणि 'सेवांगण फाउंडेशन' यांच्या संयुक्त प्रयत्नातून 'रंगोत्सव' अत्यंत आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. या वेळी विद्यार्थ्यांना 'टाय ॲन्ड डाय' या पेंटिंग तंत्राची ओळख करून दिली. फॅब्रिक रंगांद्वारे कापडावर चित्र रेखाटताना मुलांच्या चेहऱ्यावर उत्सुकता आणि आत्मविश्वास दिसत होता. सेवांगण फाउंडेशनच्या वतीने संस्थेचे सचिव विनायक नाईक यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग घेतला.

कार्यशाळेचे यशस्वी आयोजन मुरुड प्रशासन अधिकारी दीपाली दिवेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. अशाप्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासात रस निर्माण होईल, सेवांगण फाउंडेशनचे कौतुक करताना, नवनवीन रंजक आणि दैनंदिन जीवन समृद्ध करणारे उपक्रम या फाऊंडेशनकडून यापुढे निरंतर घेण्यात यावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या वेळी इतर उपस्थितांमध्ये संध्या नागे, सायली गुंजाळ, उत्कर्षा रणदिवे, अविनाश ठाकूर, मयूर चौलकर, सुनीलकुमार पवार, पल्लवी रेवडे, प्रीती सैंदाणे, राकेश राखडे, राजेश भोईर हे शिक्षक तसेच नगरपालिका शाळेतील दोनशेहून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

## श्रीगाव येथे हनुमान जन्मोत्सव सोहळा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग तालुक्यातील श्रीगाव येथील हनुमान मंदिरात ८ ते १२ एप्रिलपर्यंत हनुमान जन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये हरीपाठ, प्रवचन व हरिजागरण आदी धार्मिक कार्यक्रम पार पडत आहेत. १२ एप्रिल रोजी सकाळी ५ वाजता हनुमान जन्मोत्सव कीर्तन ह. भ. प. जगन्नाथ राऊत (देहेन) यांचे होणार आहे रात्रौ ९ नंतर हनुमान पालखी मिरवणूक श्रीगाव गावामध्ये निघणार आहे तरी सर्वांनी या सोहळ्यासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीगाव ग्रामस्थ मंडळ यांनी केले आहे.



# उच्च दर्जाचे शिक्षण घेऊन स्वकर्तृत्वावर आपले अस्तित्व निर्माण करा -प्रसाद पांढरे

**पाली : प्रतिनिधी**

उच्च दर्जाचे शिक्षण घेऊन स्वकर्तृत्वावर तरुणांनी आपले अस्तित्व निर्माण करावे, असा मौलिक संदेश वडखळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी युवा पिढीला दिला.



याबरोबरच सण व उत्सवात शांतता सलोखा, एकोपा, बंधुभाव राखला जावा, प्रबोधनात्मक व जनजागृतीपर कार्यक्रम राबविले जावेत यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन देखील पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी केले. काराव गडब येथील शांतता कमिटीच्या बैठकीत उपस्थित तरुण व ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक पांढरे यांनी मोलाचा संदेश दिला.

आज संपूर्ण जगात भारताला कमकुवत करण्यासाठी शत्रू राष्ट्राची चाल सुरू आहे, भारताच्या तरुण पिढीला व्यसनाधीन करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. चरस, गांजा, अमली पदार्थ याची लथ लावून या नशेच्या आहारी घालवून त्यांना उध्वस्त करण्याचे कारस्थान केले जाते, सोशल मीडियाच्या माध्यमातून त्यांना मूळ करियर, उद्देशापासून दूर नेले जाते, तरुणांनी हे धोके ओळखून त्यांनी स्वयंम निर्व्यसनी राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे, आपण जर चरस गांजा अफू याचे सेवन करत असू तर ते शत्रू राष्ट्राला मदत करण्यासारखे आहे.

व्यसन न करण्याची शपथ तरुणांनी विद्यार्थ्यांनी घेऊन देशाला उज्वल भवितव्याकडे नेण्याची प्रतिज्ञा युवा पिढीने घेतली पाहिजे असे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे म्हणाले. सण व उत्सवातून संस्कार पेरण्याचे काम करावे, हेच प्रबोधन अंगिकरून आम्ही ग्रामीण भागातून येत पुढे पोलीस इन्स्पेक्टर झालो. गाव तिथे वाचनालय निर्माण झाले पाहिजे, विद्यार्थ्यांना व्यायाम व अभ्यास वाचनाकडे वळविले पाहिजे, मुलांना स्पर्धा परिक्षेकडे वळविले पाहिजे, त्याच्या ज्ञानात भर पडेल त्यातून गावाचे उज्वल भवितव्य निर्माण होईल असा विश्वास आहे. असे पोलीस निरीक्षक पांढरे म्हणाले.

## ग्रीन सोल फाऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना वस्तूंचे वाटप

**कर्जत : प्रतिनिधी**

ग्रीन सोल फाऊंडेशनचे माध्यमातून कर्जत तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या २१ शाळांमधील ८१८ विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप करण्यात आले. स्कूल बॅग, चप्पल बूट,चटई, शैक्षणिक साहित्य यांचे वाटप करण्यात आले.



कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि ग्रामीण भागात ग्रीन सोल फाऊंडेशन कडून शैक्षणिक मदत देण्याचे कार्यक्रम आयोजित केले जातात. विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांसाठी शैक्षणिक साहित्याची मदत देण्यासाठी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न ग्रीन सोल फाऊंडेशन कडून सुरू आहे. तालुक्यातील पाली, पोटल, कुंडलज, भालीवडी, कराळे वाडी, भिवपुरी, फणसवाडी, आंबोट, धुळेवाडी, पाली कातकर वाडी, अवसरे, वैजनाथ, वंजारवाडी, माले वाडी, हुमगाव, मांडवणे, आंबे वाडी, सापेले, हिरेवाडी आदी ठिकाणी ग्रीन सोल फाऊंडेशनकडून शैक्षणिक साहित्याची मदत देण्यात आली.

संस्थेच्या वतीने नीता समीर देशमुख यांच्या प्रयत्नमुळे हे वाटप करण्यात आले. त्यावेळी ग्रीन सोल फाऊंडेशनचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुरूडमध्ये रक्तदान शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड महादेव कोळी समाज राजपुरी कोळीवाडा व डॉ. मंगेश पाटील यांचे श्रीयश हॉस्पिटल आणि शासकीय रक्तपेढी जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान सोहळाचे आयोजन शनिवारी (दि.१२) सकाळी ८.३० ते १ वाजेपर्यंत श्रीयश हॉस्पिटलसमोर आयोजित करण्यात आले आहे.

प्रत्येक रक्तदात्यास आकर्षक भेटवस्तू देण्यात येणार आहे. शहरांसह पंचक्रोशी भागातील जास्तीत जास्त नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभागी होऊन रक्तदान करा रक्तदान हे समाजसेवेसारखे मोठे काम आहे.रक्तदानामुळे अनेकांना जीवदान मिळते तरी चला आणि रक्तदान करूया, असे आवाहन मुरूड शहरातील स्त्रीरोग तज्ज्ञ आणि प्रस्तुती तज्ज्ञ डॉ. मंगेश पाटील यांनी केले आहे.

# बळवली येथे राम नवमी उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील बळवली येथे दरवर्षी रायगड जिल्ह्यातून हजारोंच्या संख्येने श्रीराम भक्त श्रीराम नवमी उत्सवात सहभागी होतात. ग्रामस्थ मंडळ बळवली आयोजित श्रीराम जन्मोत्सव आठवडाभर साजरा होत असतो.



दुष्ट, दुर्जनांचा नाश करून कुशल प्रशासनाचा आदर्श निर्माण करणारे मर्यादा पुरुषोत्तम 'श्रीराम' हे सज्जनशीलता, मातृ-पितृ भक्ती आणि प्रेरणेचा आदर्श स्त्रोत आहेत. या निमित्ताने गुढीपाडवा ते श्रीराम नवमी हरिजागर भजन असा दैनंदिन कार्यक्रम झाला. सर्वजण श्रीरामांच्या भक्तीत लीन झाले. यामध्ये वारकरी भजन मंडळ, बळवली ग्रामस्थ, श्रीराम भजन मंडळी बळवली तसेच बळवली पंचक्रोशीतील सर्व श्रीरामभक्त यांचे मोलाचे योगदान लाभले. सर्वजण श्रीरामांच्या भक्तीत लीन झाले होते.

चैत्र शुद्ध नवमी, हिंदू पंचांगानुसार चैत्र महिन्यातील नवरात्राचा नववा दिवस आहे. या तिथीस भगवान विष्णूचा अवतार समजले गेलेले श्रीराम प्रभू यांचा जन्म झाला म्हणून हा दिवस श्रीरामनवमी म्हणून साजरा करतात.

या दिवशी सूर्य डोक्यावर आल्यावर दुपारी बारा वाजता श्रीराम जन्माचा सोहळा साजरा होतो. बळवली फाटा ते बळवली गावापर्यंत रस्त्याच्या दुतर्फा भगवे झेंडे आणि सुंदर अशा रांगोळी काढून सुशोभीकरण करण्यात आले होते. सर्व वातावरण श्रीरामभक्तिमय झाले होते. सकाळी १० ते १२.४०पर्यंत स्पृहा चक्रदेव (रत्नागिरी) यांचे श्रीराम जन्मोत्सव पुष्पवृष्टीचे कीर्तन झाले. दुपारी १२ वाजून ४० मिनिटांनी सूर्य माध्यावर आल्यावर प्रभू श्रीराम यांच्या मूर्तीवर पुष्पसुमनांचा वर्षाव केला.

## वरवठणे येथील विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील नागोठणे जवळील वरवठणे येथील मारुती मंदिरात भाजप नेते किशोर म्हात्रे यांच्या सौजन्याने विध्यार्थ्यांना सायकल वाटप कार्यक्रम झाला.

या वेळी भाजप नेते किशोर म्हात्रे यांच्या समवेत चौडेश्वरी देवस्थानचे सचीव दत्ताराम करजेकर, माजी उपसरपंच हरीश्चंद्र म्हात्रे, तुकाराम भोय, नारायण म्हात्रे, किशोर नाईक, नरेश पाटील, स्नेहा दांडेकर, मोहन करजेकर, ज्ञानेश्वर म्हात्रे, किर्ती राणे, काशिनाथ म्हात्रे, मधुकर रविंद्र म्हात्रे, जय किशोर म्हात्रे, शुभम राणे, विश्वनाथ पाटील, मधुकर म्हात्रे मंगेश पाटील, मधुकर करजेकर, सपना म्हात्रे आदी मान्यवर ग्रामस्थ उपस्थित होते.

दरम्यान, श्रेया दांडेकर, संस्कृती पाटील, निधी पाटील, लावण्या करजेकर, आराध्या राणे, ईश्वरी दांडेकर, खुशी साळुंके, साक्षी राणे, शुभ्रा पाटील, परी म्हात्रे, आरोही म्हात्रे, कृतीका शेडगे, तनीषा बैकर आदी १३ विद्यार्थीनीना सायकल वाटप करण्यात आल्या.



## वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात पर्यटनस्थळे जास्त प्रमाणात असल्याने येथे पर्यटक अधिक संख्येने येत असतात. त्याचा वाहतूकीवरही परिणाम होतो. त्यामुळे वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मंगळवारी (दि.८) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २४९ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून दोन लाख ५० हजार ५०० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या सुरू असलेल्या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

# चेन्नईविरुद्ध पंजाब 'किंग'

## युवा क्रिकेटर प्रियांश आर्यचे वादळी शतक

**मुल्लानपूर : वृत्तसंस्था**

पंजाब किंग्जने घरच्या मैदानावर पहिला विजय मिळवला आहे. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाबने गेल्या सामन्यातील पराभवानंतर जोरदार पुनरागमन केले आणि चेन्नई सुपर किंग्जचा १८ धावांनी पराभव केला.

मुल्लानपूरमध्ये खेळल्या गेलेल्या या सामन्यात २४ वर्षीय युवा फलंदाज प्रियांश आर्यने वादळी शतक झळकावून संघाचे लक्ष वेधून घेतले आणि संघाला २१९ धावांच्या मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले. चेन्नई संघ २०१ धावा करू शकला. यासह चेन्नईला सलग चौथ्या पराभवाचा सामना करावा लागला आहे.



पंजाबने दिलेल्या २२० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चेन्नईच्या सलामीवीरांना सूर गवसला आणि त्यांनी चांगली सुरुवात करून दिली. रचिन रवींद्र ३६ धावा करत बाद झाला. डेव्हॉन कॉन्वेने संघाला चांगली सुरुवात करून देत अर्धशतकी खेळी केली. कॉन्वे ४९ चेंडूत सहा चौकार आणि दोन षटकारांसह ६९ धावा करत रिटायर्ड आऊट झाला, तर शिवम दुबेने २७ चेंडूत ४२ धावांची शानदार खेळी केली.

धोनी २७ धावा करत अखेरच्या षटकात झेलबाद झाला आणि पुन्हा एकदा संघाला विजय मिळवून देण्यात अपयशी ठरला. पंजाबकडून लॉकी फर्ग्युसनने दोन विकेट्स घेतल्या, तर यश ठाकूर आणि मॅक्सवेलने प्रत्येकी एक गडी बाद केला. पंजाब संघाने या सामन्यात काही झेल सोडले, ज्याचा त्यांना फटका बसला, पण अखेरीस संघाने विजय मिळवला.

तत्पूर्वी प्रथम फलंदाजी करताना पंजाबने या मैदानावर आतापर्यंतची सर्वात मोठी धावसंख्या उभारली. प्रियांशने पहिल्याच षटकात दोन षटकार मारून आपल्या आक्रमक फलंदाजीचा नमुना दिला, पण दुसऱ्या टोकाकडून संघ सातत्याने विकेट गमावत होता. पॉवरप्लेमध्येच संघाच्या तीन विकेट्स पडल्या आणि आठव्या षटकापर्यंत निम्मा संघ माघारी परतला होता. त्या वेळी धावसंख्या फक्त ८५ होती, तर बाद झालेल्या फलंदाजांचे योगदान फक्त २३ धावांचे होते.

यानंतर प्रियांशने प्रथम १९ चेंडूत तुफानी अर्धशतक झळकावले आणि नंतर १३व्या षटकात त्याने मथिशा पाथिरानाच्या गोलंदाजीवर सलग तीन षटकार आणि एक चौकार लगावत केवळ ३९ चेंडूत शतक पूर्ण केले. त्याच्या पाठोपाठ शशांक सिंग (नाबाद ५२) आणि मार्को यानसेन (नाबाद ३४) यांनी मिळून ६५ धावांची भागीदारी करीत संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत पोहचवले होते.

## श्रेयस अय्यरने टाकले विराटला मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्ज संघाची हाराकिरी यंदाच्या हंगामात सुरूच आहे. पहिला सामना जिंकल्यानंतर



चेन्नईने सलग चार सामन्यात पराभवाचा सामना केला. पंजाब किंग्जने मंगळवारच्या सामन्यात सीएसकेवर १८ धावांनी विजय मिळवला. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखालील पंजाबच्या संघाचा चार सामन्यात तिसरा विजय ठरला. या विजयासह श्रेयसने विराट कोहलीला मागे टाकले आहे.

पंजाब संघाने चेन्नईवर मात केल्याने श्रेयस अय्यर हा यशस्वी कर्णधारांच्या यादीत पोहचला. आयपीएलच्या सुरुवातीपासून ते आतापर्यंत चेन्नईच्या संघाला पराभूत करणे फारसे कुणालाही जमलेले नाही, पण श्रेयसने कर्णधार म्हणून सीएसकेला पाचव्यांदा पराभूत केले. विराट कोहलीने कर्णधार म्हणून चेन्नईचा चार वेळा पराभव केला होता. त्याला श्रेयसने मागे टाकले. या यादीत रोहित शर्मा १२ विजयांसह आघाडीवर आहे.







## चौकार-षटकारांची आतषबाजी करीत प्रियांशने ठोकले जलद शतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चेन्नई सुपर किंग्जची गोलंदाजी फोडून काढत पंजाब किंग्जच्या प्रियांश आर्यने वादळी शतक झळकावले. त्याने फक्त ३९ चेंडूत सात चौकार आणि नऊ षटकारांच्या मदतीने शतकी खेळी साकारली. यासह तो आयपीएलच्या इतिहासात पंजाबसाठी सर्वात जलद शतक करणारा दुसरा फलंदाज बनला आहे.

प्रियांश आर्य आयपीएलच्या इतिहासात सर्वात जलद शतक ठोकणारा दुसरा भारतीय फलंदाज बनला आहे. या यादीत पहिल्या स्थानी युसूफ पठाण आहे. त्याने २०१०मध्ये ३७ चेंडूत शतक पूर्ण केले होते, तर प्रियांशने ३९ चेंडूत शतक पूर्ण केले. तो पंजाब किंग्जसाठी सर्वात जलद शतक करणारा दुसरा फलंदाज बनला आहे. पंजाबसाठी सर्वात जलद शतक डेव्हिड मिलरने २०१३ मध्ये केले होते. आरसीबीविरुद्धच्या सामन्यात त्याने ३८ चेंडूत शतक ठोकले होते.

प्रियांश आर्य हा दिल्लीचा डावखुरा फलंदाज आहे. त्याचा जन्म जानेवारी २००१मध्ये उत्तर प्रदेशमधील फतेहपूर येथे झाला. तो भारतीय स्थानिक क्रिकेटमध्ये दिल्ली संघाकडून खेळतो. देशांतर्गत क्रिकेटमध्ये साउथ दिल्ली सुपरस्टार्सकडून खेळताना त्याने नॉर्थ दिल्ली स्ट्रायकर्सविरुद्ध एका षटकात सहा षटकार मारले. यानंतर त्याच्या नावाचा गवगवा झाला. त्या सामन्यात त्याने फक्त ४० चेंडूत आपले शतक पूर्ण केले होते.

## रायगड कबड्डी लीग : आवास वायपर्सचा प्लेऑफमध्ये प्रवेश निश्चित

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनतर्फे आयोजित रायगड कबड्डी लीग स्पर्धेत आवास वायपर्सने सलग पाच सामने जिंकून आपली विजयी घोडदौड सुरू ठेवली आहे. आवसचे २५ गुण झाले असून या संघाने गुणतालिकेत अव्वल स्थान मिळवले आहे. आवासने प्लेऑफमधील प्रवेश जवळपास निश्चित केला आहे.

या स्पर्धेत प्रत्येक संघाला सात साखळी सामने खेळायचे आहेत. साखळी सामन्यांतील अव्वल चार संघांना प्लेऑफमध्ये प्रवेश मिळणार आहे. आवस वायपर्स संघाचे सातपैकी पाच सामने झाले आहेत. हे पाचही सामने आवासने जिंकले आहेत.

पेण वॉरियर्स संघ १९ गुण मिळवून दुसऱ्या स्थानावर आहे. पेण वॉरियर्सचे पाच सामने झाले आहेत. त्यापैकी तीन सामने त्यांनी जिंकले असून एका सामन्यात त्यांना पराभव पत्करावा लागला. त्यांचा एक सामना बरोबरीत सुटला. पेण वॉरियर्स आणि एस.बी. फायटर्स यांच्यातील सामना २८-२८ असा बरोबरीत सुटला. एम.डी. वॉरियर्स संघ पाच सामने खेळला असून त्यापैकी तीन सामने त्यांनी जिंकले आहेत. त्यांचे १७ गुण झाले आहेत. सामिरा छावा संघाने तीन सामने जिंकून १६ गुणांची कमाई केली आहे. हा संघ गुणतालिकेत चौथ्या स्थानावर आहे. एस.बी. फायटर्सचे चार सामन्यांमध्ये आठ गुण झाले आहेत. या संघाचे अजून तीन सामने शिल्लक आहेत. उरलेले तीनही सामने जिंकले तर या संघाला प्लेऑफमध्ये प्रवेश मिळवण्याची संधी असेल. पेण वॉरियर्स, एम.डी. वॉरियर्स, समिरा छावा, एस.बी. फायटर्स या तीन संघांमध्ये प्लेऑफमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी चुरस आहे.

### विजेतेपदासाठी अशा होतील लढती

गुणतालिकेतील पहिल्या चार क्रमांकांचे संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करतील. या अव्वल चार संघांमध्ये विजेतपदासाठी चुरस होईल. साखळीत पाहिल्या स्थानवर आणि दुसऱ्या स्थानावर असलेले संघ क्वालीफायर गटात असतील. तृतीय आणि चतुर्थ क्रमांकांचे संघ एलिमिनेटर गटात असतील. क्वालीफायर गटातील प्रथम आणि दुसऱ्या क्रमांकातील संघात लढत होईल. या लढतीत जो संघ विजयी हाईल तो संघ अंतिम फेरीत प्रवेश मिळवेल. त्यानंतर एलिमीनेटर गटातील तृतीय व चतुर्थ क्रमांकाच्या संघात सामना होईल. हा सामना जो संघ जिंकेल तो संघ क्वलिफायर गटातील पराभूत संघाबरोबर समान खेळेल. या सामन्यात विजयी होणारा संघ क्वालिफायर गटातील विजयी संघाबरोबर विजेतेपदासाठी लढत देईल.




### न्यूझीलंडचे कोच स्टीड यांचा राजीनामा

**वेलिंग्टन : वृत्तसंस्था**


न्यूझीलंड क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे. गॅरी स्टीड यांनी अचानक संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला. ते यापुढे एकदिवसीय आणि टी-२० फॉरमॅटमध्ये किवी खेळाडूंना कोचिंग करताना दिसणार नाहीत, तर कसोटी संघाच्या प्रशिक्षकपदाबाबत ते विचार करत आहेत.

स्टीड यांची २०१८मध्ये माइक हेसन यांच्या राजीनाम्यानंतर न्यूझीलंडच्या मुख्य प्रशिक्षकपदी नियुक्ती झाली होती. त्यांच्या कार्यकाळात न्यूझीलंडने २०१९ विश्वचषक स्पर्धेची फायनल, तर २०२१ टी-२० विश्वचषक स्पर्धेची फायनल गाठली. याशिवाय २०२१मध्ये पहिल्यावहिल्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप विजेतेपद मिळवले होते.






ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।




विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।

**वर्ष २० वे**

**वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।। ज्ञान होय अज्ञानासी। ऐसा वर त्या टीकेसी ।। ज्ञान होय मूढा । अती मूर्ख त्या दगडा ।। वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी।।**



सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।



तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

**श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत**

**माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित**

# अखंड हरिनाम सप्ताह

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**

**सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा.सु. ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, गुरुवार दि. १०/०४/२०२५ ते चैत्र कृ. ४ गुरुवार दि. १७/०४/२०२५ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.**

**दैनंदिन कार्यक्रम**

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.

व्यासपीठ चालक : ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.३० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन

सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०८.०० ते १०.०० वा. - कीर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | कीर्तन (रात्री ८ ते १०) |
|---|---|---|
| **गुरुवार** (दि. १०/०४/२०२५) | ह.भ.प. दिपक महाराज (कुंडेगाव) | ह.भ.प. नरहरी महाराज सांगळे (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदी) सौजन्य : श्री. सुधीर तुलशिदास ठाकूर (खारकोपर) |
| **शुक्रवार** (दि. ११/०४/२०२५) | ह.भ.प. रोशन महाराज (बेलपाडा) | श्री श्री १००८ महामंडलेश्वर रामकृष्णानंद सरस्वती महाराज (वहाळ) |
| **शनिवार** (दि. १२/०४/२०२५) | ह.भ.प. गोपिनाथ महाराज (जासई) | ह.भ.प. बाळकृष्ण महाराज गोगावले (सासेवाडी, ता. भोर, जि. पुणे) कै. गिताबाई त्रिंबक देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य- श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण) |
| **रविवार** (दि. १३/०४/२०२५) | ह.भ.प. राजेंद्र महाराज गुरुजी (कुंडेगाव) | भाषाप्रभू ह.भ.प. रमेश महाराज भोर पाटील (अकोले) कै. सविता शिवाजी देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य -श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **सोमवार** (दि. १४/०४/२०२५) | ह.भ.प. कृष्णा महाराज ठाकूर (धुतुम) | ह.भ.प. श्री. भगिरथ महाराज काळे (सिन्नर) कै. शिवाजी रघुनाथ देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| **मंगळवार** (दि. १५/०४/२०२५) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (जोग महाराज वारकरी शिक्षण संस्था, देवाची आळंदी) कै. शिवाजी गजानन पाटील यांच्या स्मरणार्थ सौजन्य : सौ. ललिता सुनील पाटील (खारकोपर) |
| **बुधवार** (दि. १६/०४/२०२५) | सकाळी ८.३० वा. - ग्रंथराज ज्ञानेशरी पुजन सायं.४ ते ५ वा. - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. गाथामूर्ती देवेंद्र महाराज निढाळकर (आळंदी देवाची) सौजन्य : सौ. श्रद्धा रमेशशेठ ठाकूर (खारकोपर) |

**काल्याचे कीर्तन, गुरुवार, दि. १७/०४/२०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा. भाषाप्रभू ह.भ.प. जगन्नाथ महाराज (आसनगाव)**
**सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत (शेलघर)**

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com